मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १३३
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

‘त्या’ मद्यपी कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई/२
ठेकेदार, अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी पिटाळले/५
पहिला कसोटी सामना अखेर अनिर्णीत/६

### ‘ओमिक्रॉन’ अत्यंत धोकादायक; ‘डब्ल्यूएचओ’चा इशारा



**जिनेव्हा :** कोरोनाचा नवा व्हेरियेंट ओमिक्रॉन हा जगासाठी अत्यंत धोकादायक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) म्हटले आहे. डब्ल्यूएचओने सोमवारी (दि. २९) याबाबतचा इशारा देताना सांगितले की, अत्यंत संक्रमणकारी आणि धोकादायक असणाऱ्या या विषाणूबाबतची अनिश्चितता कायम आहे. जर ओमिक्रॉन व्हेरियेंटमुळे पुन्हा एकदा मोठी लाट आली तर त्याचे परिणाम हे अत्यंत गंभीर असू शकतात, मात्र अद्यापपर्यंत तरी ओमिक्रॉन व्हेरियेंटशी निगडित एकही मृत्यूची नोंद झालेली नाहीये. सर्वांत आधी हा व्हेरियेंट दक्षिण आफ्रिकेत आढळला असून तो हळूहळू आपले पाय पसरत आहे. कोरोनाचे इतर व्हेरियेंट डेल्टा, अल्फा, बीटा, गॅमा यांच्याप्रमाणेच ओमिक्रॉनदेखील अत्यंत चिंताकारक अशा वर्गीकरणात मोडतो. त्यामुळे अनेक देशांनी आंतरराष्ट्रीय उड्डाणांवरील प्रतिबंध पुन्हा एकदा लादले आहेत.

## संसदेचे हिवाळी अधिवेशन

# १२ खासदारांचे निलंबन

### गेल्या वेळी घातलेल्या गोंधळाबद्दल कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑगस्ट महिन्यात झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी घातलेल्या अभूतपूर्व गोंधळामुळे विरोधी पक्षाच्या १२ खासदारांचे संसदेचे हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत निलंबन करण्यात आले आहे. निलंबित खासदारांमध्ये काँग्रेसचे सहा, तृणमूल काँग्रेस, शिवसेनेचे प्रत्येकी दोन आणि सीपीआय व सीपीएमच्या प्रत्येकी एक खासदाराचा समावेश आहे.

सभागृहात गैरवर्तणूक करून कामकाजामध्ये अडथळा आणल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे. कारवाईचा सर्वांत मोठा फटका काँग्रेसला बसला आहे. निलंबित खासदारांमध्ये सर्वाधिक म्हणजेच अर्धे खासदार काँग्रेसचे आहेत.

पावसाळी अधिवेशनादरम्यान राज्यसभेत ११ ऑगस्ट रोजी झालेल्या मान्सून सत्रात १२ खासदारांनी सभागृहाची प्रतिमा मलिन होईल अशी वर्तणूक केली. त्यामुळेच राज्यसभा सदस्यांच्या वर्तवणुकीसंदर्भातील नियमांमधील नियम क्रमांक २५६ नुसार या १२ खासदारांचे हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीसाठी निलंबन करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली.

**निलंबित खासदार**

फुलो देवी नेताम, छाया वर्मा, रिपून बोरा, राजमणी पटेल, सय्यद नसीर हुसैन, अखिलेश प्रसाद सिंग (सर्व काँग्रेस), डोला सेन व शांता छेत्री (तृणमूल काँग्रेस), प्रियंका चतुर्वेदी व अनिल देसाई (शिवसेना), एलामारम करीम (सीपीएम), बिनोय विश्वम (सीपीआय).



### कृषी कायदे मागे घेण्याचे विधेयक लोकसभेत मंजूर

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सोमवारी (दि. २९) पहिल्याच दिवशी कृषी कायदे मागे घेण्याचे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. केंद्रीय मंत्री नरेंद्रसिंग तोमर यांनी कृषी कायदा निरसन विधेयक मांडल्यानंतर लोकसभेने ते आवाजी मतदानाने मंजूर केले. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोध होणारे तीन कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा केली होती. त्याचे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आपली तपस्या कमी पडली, असे ते म्हणाले होते.

## ‘ओमिक्रॉन’ : केंद्र सरकारकडून सुधारित गाईडलाईन्स जारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाचा नवा व्हेरियेंट ओमिक्रॉनचे रुग्ण आढळल्यानंतर अनेक देशांनी सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही सुधारित गाईडलाईन्स जारी केल्या आहेत. यानुसार संसर्गाचा धोका असणाऱ्या देशातून आलेल्या आणि लसीकरण पूर्ण झालेल्या व्यक्तींनाही विमानतळावर कोरोना चाचणी करणे अनिवार्य असणार आहे.




संसर्गाचा धोका असणाऱ्या देशांमधून येणाऱ्या नागरिकांना भारतात येण्यासाठी प्रवास सुरू करण्यापूर्वी ७२ तास आधी कोरोना चाचणी करणे बंधनकारक असणार आहे तसेच भारतात विमानतळावर दाखल झाल्यानंतर पुन्हा कोरोना चाचणी करावी लागेल. या चाचण्यांमध्ये पॉझिटिव्ह येणाऱ्या व्यक्तींना क्वारंटाइन करून त्यांच्यावर क्लिनिकल मॅनेजमेंट प्रोटोकॉलनुसार उपचार केले जातील. याशिवाय त्यांचे नमूने संपूर्ण जिनोमिक सिक्वेन्सिंगसाठी दिले जातील.

विमानतळावर कोरोना चाचणी निगेटिव्ह आलेल्या प्रवाशांना घरी जाण्याची परवानगी देण्यात येईल, पण त्यांना सात दिवस होम आयसोलेशनमध्ये राहावे लागेल. आठव्या दिवशी त्यांनी पुन्हा कोरोना चाचणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर सात दिवस सेल्फ मॉनिटरिंग करावे लागणार आहे.

आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे की, इतर देशांतून येणाऱ्या प्रवाशांपैकी पाच टक्के प्रवाशांची तपासणी केली जाईल, तर संबंधित विमान कंपनीला प्रत्येक फ्लाइटमध्ये येणाऱ्या प्रवाशांपैकी गरज वाटणाऱ्या पाच टक्के प्रवाशांची तपासणी करावी लागेल.

## राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा परिषदांची सदस्य संख्या वाढविण्याबाबत सोमवारी (दि. २९) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या संदर्भातील विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

सध्या राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ इतकी आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१मधील कलम ९ (१)मध्ये सुधारणा करून जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५५ व जास्तीत जास्त ८५ असे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या सुधारणेमुळे सध्याची जि. प. व पं. स. सदस्यांची संख्या वाढेल.

## राज्याचे हिवाळी अधिवेशन २२ डिसेंबरपासून मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन २२ डिसेंबरपासून मुंबईत होणार आहे. २२, २३, २४ असा कार्यक्रम नक्की झाला असून दुसऱ्या आठवड्यात २७ आणि २८ डिसेंबर असा कार्यक्रम ठरला आहे, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री अनिल परब यांनी सोमवारी (दि. २९) दिली.

राज्यातील यंदाच्या हिवाळी अधिवेशनात एकूण १२ विधेयके असणार आहेत, तर तारांकित प्रश्नांसंदर्भात गुरुवारी सभापतींकडे बैठक होणार आहे, तसेच २४ डिसेंबरला पुन्हा बैठक घेऊन अधिवेशन वाढवायचे किंवा नाही यावर निर्णय घेतला जाईल, असे परब म्हणाले. ज्यांचे दोन कोरोना डोस झाले आहेत त्यांनाच अधिवेशनामध्ये प्रवेश मिळेल, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

### तोकडे अधिवेशन, कालावधी वाढवा -फडणवीस



*कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीनंतर विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, चार ते पाच दिवसांचे तोकडे अधिवेशन होणार आहे. पहिला दिवस पुरवणी मागण्यांचा असणार आहे. आमची मागणी होती की अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, मात्र संसदीय कामकाजात ठाकरे सरकारला रस नाही, अधिवेशन टाळण्याचा प्रयत्न ठाकरे सरकारकडून होत आहे, असा आरोप फडणवीस यांनी केला.*

## स्थानिक निवडणुकांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**



ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढविणाऱ्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या संदर्भातील अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेनंतर काढण्यात येईल.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका राखीव जागांवर लढवू इच्छिणाऱ्या व्यक्तींना नामनिर्देशनपत्रासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते. (पान २ वर..)

## निवडक

### ‘आरबीआय’कडून डिजिटल चलनाचा सरकारला प्रस्ताव

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने देशात डिजिटल चलन लॉन्च करण्यासाठी केंद्र सरकारला प्रस्ताव दिला आहे. याबाबत संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सोमवारी (दि. २९) माहिती देण्यात आली. आरबीआयच्या या प्रस्तावात बँक चलनाच्या व्याख्येचा परीघ वाढवण्याची मागणी करण्यात आली. केंद्रीय बँकेने करन्सीला डिजिटल फॉर्ममध्ये स्वीकारण्याची शिफारस केली आहे.

### ‘त्या’ फोटोच्या वादानंतर थरूर यांनी मागितली माफी

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभा खासदार शशी थरूर यांनी सोमवारी (दि. २९) संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होताच सहा महिला खासदारांसोबतचा एक फोटो पोस्ट केला. या फोटोला थरूर यांनी ‘कोण म्हणते लोकसभा ही कामासाठी आकर्षक जागा नाही’, असे कॅप्शन दिले. या सेल्फीवरून गोंधळ व वाद सुरू झाल्याने थरुर यांनी याबाबत माफी मागितली आहे.

## तळोजा एमआयडीसीमध्ये टँकरच्या धडकेत तिघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीत दीपक फर्टिलायझर्स कंपनीजवळच्या रस्त्यावर सोमवारी (दि. २९) झालेल्या भीषण अपघातात पनवेल महापालिकेच्या दोन कंत्राटी सफाई कामगारांसह सिडकोच्या माळी कामगाराचा मृत्यू झाला आहे.

पनवेल महापालिकेत काम करणारे दोन कंत्राटी सफाई कामगार शांताराम बाळाराम निरगुडा (वय २७, रा. वाघ्राची वाडी, ता. पनवेल) आणि काळुराम नाग्या पारधी (२७, सागाची वाडी, ता. पनवेल) तसेच सिडकोत माळी म्हणून काम करणारा त्यांचा मित्र भुऱ्या पारधी असे तिघे तळोजा एमआयडीसीतील काम करून मोटरसायकलवरून घरी परतत होते. दीपक फर्टिलायझर कंपनीजवळच्या रस्त्यावर एका टँकरखाली चिरडून या तिघांचा मृत्यू झाला.



अपघात झाल्याचे समजताच गर्दी जमा झाली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन जमावाला शांत केले. दरम्यान, साई गणेश इंटरप्रायझेस कंपनीचे व्यवस्थापक राकेश भुजबळ यांनी अपघाताच्या वृत्ताला दुजोरा देत सांगितले की, शांताराम निरगुडा आणि काळुराम पारधी हे दोन्ही कामगार आमच्याकडे कामाला असून कामावरून घरी जात असताना त्यांना अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. दोघांना उपजिल्हा रुग्णालयात आणले असता, त्यांना मृत घोषित करण्यात आले आहे, तर त्यांच्यासोबत त्यांचा मित्र भुऱ्या पारधी हा सिडकोचा माळी कामगार होता. अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, पण त्याचाही मृत्यू झाला आहे. दरम्यान, या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## शाळेसाठी आता नवी नियमावली

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात १ डिसेंबरपासून प्राथमिक शाळाही सुरू होणार आहे. कोरोनाची बदलती परिस्थिती पाहता शिक्षण विभागाने नवी नियमावली जाहीर केली आहे. एका बाकावर एकच विद्यार्थी, तर दोन बाकांमध्ये सहा फुटांचे अंतर असेल, असे नियम या नियमावलीत नमूद करण्यात आले आहेत. वर्गात जास्तीत जास्त १५ ते २० विद्यार्थ्यांचीच उपस्थिती बंधनकारक राहील, असाही आदेश या नियमावलीत देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना वर्गात येत असताना नियमांचे पालन करणे अनिवार्य असणार आहे. मास्कचा वापर, सोशल डिस्टन्सिंग, वारंवार हात धुणे इत्यादी आवश्यक असेल. एखाद्या विद्यार्थ्याला कुठल्याही प्रकारचे लक्षण दिसून आल्यास त्याला नजीकच्या आरोग्य केंद्रात पाठवण्याची सूचनाही या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये देण्यात आली आहे.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेज जिमखाना
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- आसूडगाव रा.जि.प. शाळा
- रोडपाली रा.जि.प. शाळा
- ओवे कॅम्प गाव रा.जि.प. शाळा
- पापडीचा पाडा रा.जि.प. शाळा
- रांजणपाडा रा.जि.प. शाळा
- धरणा कॅम्प रा.जि.प. शाळा
- इनामपुरी रा.जि.प. शाळा
- पिसार्वे रा.जि.प. शाळा
- फरशीपाडा रा.जि.प. शाळा
- धामोळे रा.जि.प. शाळा

### पनवेल प्रीमियर लीग २०२१



**खारघर : पनवेल समालोचक असोसिएशनच्या वतीने खारघर येथे पनवेल प्रीमियर लीग २०२१ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला रविवारी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, भाजप शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा मोर्चाचे अध्यक्ष विनोद घरत आदी उपस्थित होते. खारघरमध्ये उत्कृष्ट नियोजन करून एवढ्या मोठ्या प्रमाणावर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून अतिशय प्रभावित करणारी ही लीग असल्याचे सांगत सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले आणि खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.**

## निधीअभावी रायगडातील विकासकामे रखडली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात दळणवळणासाठी जिल्हा परिषदेने सुमारे आठ कोटी २० लाखांची तरतूद करण्यात आली असली तरी राज्य सरकारकडून हा निधी मिळालेला नाही. त्यामुळे या कामांत अडथळा निर्माण झाला आहे.



जिल्हा परिषदेला व्यायामशाळा, सभामंडप, रस्ते आदी बांधण्यासाठी निधीची तरतूद करता येते. यंदा रायगडात सुमारे आठ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, मात्र या विकासकामांसाठी राज्य सरकारकडून अद्याप निधीच उपलब्ध झाला नाही. त्याचा परिणाम ग्रामीण भागातील विकासकामांवर होऊ लागला आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता के. वाय. बारदेस्कर म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळ्या कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे, मात्र सरकारकडून निधी उपलब्ध न झाल्याने व्यायामशाळा, सभामंडप व इतर नवीन कामे करता येत नाहीत. निधी मिळाल्यास या कामांना गती येईल.

## निवडक

### बनावटगिरी करणारा वकील अटकेत

**पनवेल :** पोलीस अधिकारी असल्याचे बनावट ओळखपत्र बाळगणाऱ्या व आपल्या कारवर दुसऱ्या वाहनाचा नंबर प्लेट लावून वावरणाऱ्या एका वकिलाला सीबीडी वाहतूक पोलिसांनी सीबीडी सेक्टर १५ भागात पकडले. दीपक वसंत चुरी असे या वकिलाचे नाव असून सीबीडी पोलिसांनी त्याला बनावटगिरी व फसवणूक केल्याप्रकरणी अटक केली आहे. अधिक चौकशीत त्याने टोल चुकविण्यासाठी व कारवर बँकेकडून जप्तीची कारवाई होऊ नये यासाठी त्याच्यावर दुसऱ्या कारचा नंबर प्लेट लावल्याचे उघडकीस आले आहे.

### वृद्ध महिलेची फसवणूक

**पनवेल :** उलवे सेक्टर १९मध्ये उभारणाऱ्या एका बांधकाम व्यावसायिकाने या इमारतीतील फ्लॅट विकत देण्याचे आश्वासन देऊन एका वृद्ध महिलेकडून तब्बल ३० लाख रुपयांची रोख रक्कम घेतली. त्यानंतर तिला गेल्या पाच वर्षांत फ्लॅट अथवा तिची रक्कम परत न करता तिची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सुधीर देवीदास गव्हाळ असे या बांधकाम व्यावसायिकाचे नाव असून एपीएमसी पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. फसवणूक झालेल्या वृद्ध महिलेचे नाव निता सावल (वय ७८) असे असून त्या उलवे सेक्टर-२१ मध्ये भाड्याच्या खोलीत कुटुंबासह राहाण्यास आहेत.

# महिला संरक्षणाबाबत आघाडी सरकारची टाळाटाळ

## भाजप नेत्या चित्रा वाघ यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

महिलांच्या संरक्षणासाठी आघाडी सरकारकडून पोलीस आणि कायदेशीर यंत्रणेत आवश्यक त्या सुधारणा करण्याचे टाळले गेल्याने महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत सातत्याने वाढ होत आहे. कुर्ला येथे एका तरुणीचा बलात्कार करून खून करण्याची घटना राज्य सरकारच्या विविध यंत्रणांच्या अपयशामुळेच घडली आहे. आघाडी सरकारने महिलांना सुरक्षा देण्याच्या घोषणा करणे थांबवून पोलीस यंत्रणेत व कायदेशीर प्रक्रियेत आवश्यक ते बदल करावेत, अशी मागणी भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी सोमवारी (दि. २९) केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.



चित्रा वाघ यांनी सांगितले की, शक्ती कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आघाडी सरकारला अजून मुहूर्त मिळालेला नाही. शक्ती कायदा यायचा तेव्हा येईल पण आहे त्या कायद्यांची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी केल्यास तसेच विद्यमान कायद्यात आवश्यक ते बदल केल्यास गुन्हेगारांना नक्कीच वचक बसेल. आजपर्यंत कधीही कायदा आणि सुव्यवस्थेची इतकी वाईट पद्धतीची लक्तरे निघाली नव्हती, ती या दोन वर्षांमध्ये निघाली. एखाद्या घटनेवरती लोकांकडून आवाज उठवला गेला की हा खटला आम्ही फास्ट ट्रॅकवर चालवू किंवा एखादा नवीन कायदा बनवू, अशा घोषणा आघाडी सरकारकडून केल्या जातात. मात्र या घोषणांना मूर्त रूप मिळत नाही याचा अनुभव शक्ती कायद्याच्या रूपातून राज्यातील महिला घेत आहेत.

राज्यातील फॉरेन्सिक लॅबमधील ५० टक्के पदे अजूनही भरली गेलेली नाहीत. परिणामी या प्रयोगशाळांकडून अहवाल मिळण्यास विलंब होत आहे. राज्यात ४५ फॉरेन्सिक मोबाइल व्हॅन आहेत. या व्हॅनमध्ये असलेल्या कीटचा योग्य वापर होत नाही. पिडीत महिलेला आणि त्या खटल्यातील साक्षीदाराला संरक्षण देण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेकडून योग्य पद्धतीने पार पाडली जात नसल्याने अनेक खटल्यांत साक्षीदार फितूर झाल्याचे दिसते. सरकारी वकिलांची रिक्त पदेही वेळेवर भरली जात नाहीत. या सर्वांचा एकत्रित परिणाम महिला अत्याचारांतील घटनांमध्ये आरोपीना शिक्षा होण्याचा दर अतिशय कमी आढळून येत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### घटना घडू नये यासाठी उपाययोजना कधी?

***एखादी घटना घडल्यावर पोलीस कारवाई करतात, पण अशा घटना घडू नये यासाठी सरकार उपाययोजना कधी करणार, असा सवाल करत चित्रा वाघ यांनी सरकारी यंत्रणेच्या हलगर्जीपणावर जोरदार हल्ला चढविला.***

साकीनाका येथिल घटनेनंतर मुंबईतील निर्जनस्थळी दिवे बसविले जावेत, बीटमार्शल, पेट्रोलिंग अशी व्यवस्था असावी असे पत्रक मुंबई पोलिसांनी प्रसिद्ध केले होते. या अनुषंगाने विनोबा भावे पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेशी पत्रव्यवहार केला, तसेच संबंधित आमदारांनाही 'आम्हाला इथे बीटची गरज आहे, असे कळविले. 'एमएमआरडीए'शीही पोलीस यंत्रणेने पत्रव्यवहार केला. 'एमएमआरडीए'चा मंत्री शिवसेनेचा, मुंबई महापालिका शिवसेनेची, स्थानिक आमदार शिवसेनेचा, मुख्यमंत्री सुद्धा शिवसेनेचे. मात्र शासकीय यंत्रणा सुस्तच राहिली. 'एमएमआरडीए'ने पोलिसांचा सल्ला मानून उपाययोजना केल्या असत्या तर ही घटना टळली असती, असेही त्यांनी नमूद केले.

## 'आघाडी सरकार विधिमंडळाला घाबरणारे'

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाच्या नावाखाली विधिमंडळाच्या अधिवेशनाचा कालावधी कमी करणारे महाविकास आघाडीचे सरकार हे विधिमंडळाला घाबरणारे सरकार आहे, अशी धारदार टीका भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी सोमवारी केली. भाजपच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भांडारी यांनी सांगितले की, कोरोना संकटातून हळूहळू सर्वच व्यवहार पूर्वपदावर येत आहेत. संसदेचे अधिवेशनही सुरू झाले आहे. मागील वर्षी आणि याही वर्षी केंद्राने कोरोनाचे कारण सांगून संसदेची अधिवेशने गुंडाळली नाहीत. महाराष्ट्रातील आघाडी सरकार मात्र कोरोनाचे कारण सांगून विधिमंडळाची अधिवेशन अत्यल्प काळाकरिता घेऊन आपण विधिमंडळाला सामोरे जाण्यास घाबरत आहोत हेच दाखवून देत आहे. राज्य सरकार एकीकडे लहान मुलांना शाळेत सोडण्यासाठी पालकांना आवाहन करत आहे, दुसरीकडे मात्र मुख्यमंत्री मंत्रालयाबरोबर विधिमंडळात येण्याचेही टाळत आहेत. विधिमंडळाचे अधिवेशन जवळ आले की नव्या विषाणूची चर्चा सुरू होते हा योगायोग नव्हे, असा टोलाही त्यांनी लगावला.

नागपूरऐवजी मुंबईला विधिमंडळाचे अधिवेशन वारंवार घेणे हा नागपूर कराराचा भंग आहे. विदर्भ महाराष्ट्रात सामील होत असताना विदर्भातील जनतेला विधिमंडळाचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला घेण्याचे वचन 'नागपूर करारा'द्वारे दिले गेले आहे. नागपुरात अधिवेशन न घेणे हा नागपूर कराराचा उघड उघड भंग आहे, असेही भांडारी यांनी नमूद केले.

आघाडी सरकारच्या द्विवर्षपूर्तीनिमित्त या सरकारच्या अपयशाचा पंचनामा करण्यासाठी राज्यभर भाजपतर्फे पत्रकार परिषदांचे आयोजन केले गेले होते. पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी पत्रकार परिषदांद्वारे आघाडी सरकारचे अपयश जनतेपुढे मांडले, अशी माहितीही त्यांनी दिली.

## इशारा देताच सिडकोला जाग; नवीन पनवेलमध्ये कामाला सुरुवात

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांना समज देण्यासाठी ६ डिसेंबर रोजी नवीन पनवेल सिडको कार्यालयावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा नेऊन कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा भाजपच्या ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी दिला होता. या इशाऱ्याने सिडकोकडून नवीन पनवेल सेक्टर १५ ए ते पी ६पर्यंतच्या रस्त्यांच्या कामाची सुरुवात करण्यात आली.



नवीन पनवेल, सिडको भवन व रायगड भवन येथील विविध सिडको कार्यालयांकडे वारंवार तक्रार अर्ज करून, प्रत्यक्ष भेटून अथवा फोनवर संपर्क करून सुद्धा कोणतेही काम केले जात नव्हते. सिडकोचे अधिकारी पनवेल महानगरपालिकेकडे बोट दाखवत होते. यामुळे ॲड. मनोज भुजबळ यांनी ६ डिसेंबर रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा नेऊन कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देणारे पत्र सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिले होते.

सिडकोच्या अधिकाऱ्यांनी हा इशारा मिळताच सोमवारपासून नवीन पनवेल १५ ए ते पी ६पर्यंतच्या रस्त्यांच्या कामाची सुरुवात केली आहे. त्याबद्दल नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी समाधान व्यक्त केले असून लवकरच इतर ही कामे पूर्ण करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## 'त्या' मद्यपी कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागच्या प्रांत कार्यालयात मद्यपान करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणार आहे. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी याबाबतची माहिती दिली. कर्मचाऱ्यांचा बेजबाबदारपणा खपवून घेतला जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अलिबागच्या प्रांताधिकारी कार्यालयात २५ नोव्हेंबरला पाच कर्मचारी कार्यालयाची वेळ संपल्यानंतर दारू पीत असल्याचे समोर आले होती. शिवराज्य ब्रिगेडच्या निलेश पाटील यांनी याबाबतचा व्हिडीओ समोर आणला होता. कार्यालयात दारू पार्टी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी रायगडच्या जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. या वेळी या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले होते.

त्यानुसार या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली जाणार असल्याची माहिती सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे आणि अलिबागचे प्रांताधिकारी प्रशांत ढगे उपस्थित होते.


दरम्यान, मद्यप्राशन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करा या मागणीसाठी निलेश पाटील यांनी १ डिसेंबरला सकाळी १० ते सायंकाळी ५ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला आहे. या आंदोलनात एकूण १८ जण सहभागी होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## 'अभाविप'च्या कोकण अध्यक्षपदी श्रीकांत दुदगीकर; तर अमित ढोमसे प्रदेश मंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) कोकण प्रदेश अध्यक्षपदी श्रीकांत दुदगीकर, तर प्रदेश मंत्री म्हणून अमित ढोमसे यांची निवड करण्यात आली. ही घोषणा निर्वाचन अधिकारी प्रा. वरदराज बापट यांनी मुंबई येथे केली. गोवा येथे ३, ४ व ५ डिसेंबर २०21 रोजी होणाऱ्या अभाविप कोकण प्रदेशाच्या ५६व्या प्रदेश अधिवेशनामध्ये नवनिर्वाचित प्रदेश अध्यक्ष आणि प्रदेश मंत्री आपला पदभार स्वीकारतील.

श्रीकांत रमेश दुदगीकर हे २०१३पासून अभाविपच्या संपर्कात असून त्यांचे एम कॉम एलएलबीपर्यंत शिक्षण पूर्ण झाले आहे. ते रत्नागिरी येथील गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात वाणिज्य विषयाचे अध्यापन करतात. कोकणातील नामवंत रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद मंडळाचे सचिव आणि नियामक मंडळ सदस्य आहेत. यापूर्वी रत्नागिरी शहर उपाध्यक्ष, रत्नागिरी शहर अध्यक्ष, कोकण प्रदेश उपाध्यक्ष, रत्नागिरी विभाग प्रमुख, अशा जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. तसेच अमित भरत ढोमसे हा मूळ नवी मुंबईचा कार्यकर्ता आहे. २०१७ पासून विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आहे. बीएलएस एलएलबीपर्यंत शिक्षण पूर्ण झाले आहे. त्यांनी नवी मुंबई महानगर मंत्री, जिल्हा संयोजक, पनवेल महानगर विस्तारक, उत्तर रायगड जिल्हा विस्तारक, कोंकण प्रदेश सहमंत्री अशा जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी विविध विषयांसंदर्भात मुंबई विद्यापीठाच्या समाजकल्याण विभागासोबत पाठपुरावा करीत विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले आहे. इयत्ता १२ वीच्या निकालातील गोंधळाविरोधात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयाबाहेर आंदोलनाचे नेतृत्व केले आहे, अशी माहिती कोकण प्रदेश कार्यालयमंत्री शंकर संगपाळ यांनी दिली.



प्रा. श्रीकांत दुदगीकर



अमित ढोमसे

# कळंबोलीतील मोकळ्या भूखंडांची साफसफाई

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली वसाहतीमधील अनेक भूखंड मोकळे आहेत. तर काही भूखंड आरक्षित आहेत. त्यामुळे या भूखंडावर झाडेझुडपे व गवत मोठ्या प्रमाणावर वाढले असून काही ठिकाणी या भूखंडांना जंगलाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. याच संधीचा गैरफायदा घेऊन या परिसरातील काही विकासकांनी भूखंडांचे डम्पिंग ग्राउंड केले असून अवैधपणे कचरा व राडारोडा टाकला जात आहे. त्यामुळे या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले असून डास व सरपटणाऱ्या प्राण्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे.



या संदर्भात सिडको व महापालिकेकडे कळंबोली येथील नागरिकांनी अनेक वेळा तक्रार केली होती, परंतु सिडकोच्या ताब्यात असलेले भूखंड साफ करण्यात सिडकोला कुठल्याही प्रकारे रस नसल्यामुळे सिडकोने या तक्रारींना केराची टोपली दाखवली होती, परंतु नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने पनवेल महापालिकेचे सहाय्यक आयुक्त वैभव विधाते यांनी पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून या भूखंडाची साफसफाई करण्याचे काम हाती घेतले आहे. प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे आरोग्य निरिक्षक अरूण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक सागर कोळेकर कळंबोली वसाहतीमधील जवळपास पाच ते सहा भूखंडाची साफसफाई करण्यात आली असून भूखंड सफाईचे काम चालू आहे.

> **मोकळ्या भूखंडावरील गवत व झाडाझुडपे काढून साफसफाई करावी म्हणून सिडकोला निवेदन दिले होते, परंतु पनवेल पालिकेने मोकळ्याभूखंडावर कचरा व डेब्रिज हटवण्याचे काम करत आहे. त्यामुळे येथील नागरिकांची समस्या दूर होणार आहे.**
> **-अमर ठाकूर, उपाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, रायगड**

## पान १ वरून

### स्थानिक निवडणुकांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १०च्या पोटकलम (१क) आणि ३०-१क आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२ (क), ४२ (६-क), ६७ (७-क) मधील तरतुदीनुसार निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा ३१ डिसेंबर २०२२ किंवा त्यापूर्वीचा असेल, मात्र नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी ज्या व्यक्तीने आपल्या जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केला असेल व नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकाला त्या व्यक्तीस वैधता प्रमाणपत्र मिळाले नसेल अशी व्यक्ती ती निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र देईल. त्यात कसूर झाल्यास त्या व्यक्तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात यावी, अशी तरतूददेखील करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**मनपा, नगर परिषदांसाठीही तरतूद**

जात पडताळणी समित्यांकडील कामाच्या भारामुळे केवळ वेळेत जात वैधता प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे उमेदवारांना राखीव पदांसाठी निवडणूक लढविण्याच्या संधीपासून वंचित राहावे लागू नये यासाठी उपरोक्त सर्व अधिनियमांत यापूर्वीच सुधारणा करून महानगरपालिका, नगर परिषदांच्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरताना संबंधित उमेदवारांना वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची १२ महिन्यांची मुदत हमीपत्रावर देणे अशी तरतूद करण्यात आली होती. ही तरतूद ३१ डिसेंबर २०२२पर्यंत वाढविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या संदर्भातील अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेनंतर काढण्यात येईल.

# पनवेल महापालिकेकडून जैवविविधता सांभाळून वडाळे तलावाची स्वच्छता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वडाळे तलावाचा परिसर विकसित झाल्यामुळे पनवेलकरांच्या हक्काचे ठिकाण म्हणून तलावाची ओळख बनू लागली आहे. पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका प्रशासनाने तलावाचे सौंदर्य जपण्यासाठी पावले उचलली आहेत. पुढील तीन वर्षांसाठी ठेकेदार नेमून तलावातील नैसर्गिक विविधतेला धक्का न पोहचवता पाणी स्वच्छ देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

वडाळे तलावाचा परिसर महापालिकेने विकसित केल्यानंतर इथले सौंदर्य अधिक खुलले आहे. नागरिकांची वर्दळ वाढू लागली आहे. पहाटे सायंकाळी नागरिक आवर्जून तलावाच्या परिसरात फिरायला येत आहेत. सोयीसुविधांसाठी तलावाच्या परिसरांत आणखी विकास करण्याचे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. आजवर महापालिकेने तलावासाठी १२ कोटी रुपये खर्च केले आहेत. हा खर्च १३ कोटीवर जाण्याची शक्यता आहे. तलावाच्या चोहोबाजूंनी भिंत, जॉगिंग ट्रक विकसित केला असला, तरी तलावातील पाण्यात वर्षानुवर्षे असलेली पाणवनस्पती पुन्हा तलावावर पसरू लागली आहे. तलावात पूर्वी दूषित पाणी येत असल्याच्या तक्रारी होत्या, मात्र आता तलावात कोणतेही प्रदूषण नसतानाही पाणवनस्पती वेगाने वाढू लागली आहे. सुशोभिकरणापूर्वी तलावातून सुमारे १०० क्युबिक मीटर गाळ काढला आहे. तरीदेखील तलावातील पाणवनस्पती जिवंत असून पावसाळ्यानंतर पुन्हा तलावावर पसरत आहेत. या पाणवनस्पतीसह इतर वनस्पती नष्ट करण्यासाठी पनवेल महापालिकेने तीन वर्षांसाठी ठेकेदार नेमण्याचे ठरवले आहे.

मुंबई महापालिकेने केलेल्या पवई तलाव स्वच्छतेच्या धर्तीवर पनवेल महापालिका प्रयत्न करणार आहे. पाण्यातील नैसर्गिक घनता सेंद्रीय पद्धतीने तलावातील पाण्याची साफसफाई करण्याच्या प्रयत्नात महापालिका आहे. माशांसह इतर जैवविविधतेला धक्का न पोहचविता पाणवनस्पती संपुष्टात आणणे हे आव्हानात्मक काम आहे. महापालिकेने शनिवारी जाहिरात प्रसिद्ध करून या कामासाठी ठेकेदारांकडून दर मागितले आहेत. तीन वर्षांसाठी हा ठेकेदार नेमला जाणार असून सलग तीन वर्षे वनस्पती काढली गेली, तर पुढे ही वनस्पती वाढणार नाही, असे जाणकारांचे मत आहे.

> **तलावातील पाणवनस्पती अनेक वर्षापासून वाढत आहे. प्रयत्न करूनही वनस्पती संपत नसल्यामुळे तीन वर्षांसाठी ठेकेदार नेमून तलावातील पाणी स्वच्छ ठेवण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.**
> **-संजय कटेकर, प्रकल्प अभियंता**

**बीओटी तत्त्वावर नागरिकांना सुविधा**

परिसरात फूडकोर्ट, पार्किंग तलावाची देखरेख, साफसफाई करणे, सुरक्षा ठेवणी, वीज बिल, पोटोग, लाइटिंग अशा कामासाठी महापालिका बीओटी तत्त्वावर ठेकेदार नेमणार आहे. नागरिकांना सोयीसुविधा देऊन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून तलावाची साफसफाई करायची, असा उद्देश आहे.



महाराष्ट्र शासन
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सातारा**
**One Stop Crises Centre, सातारा या केंद्राकरिता पात्रताधारक एजन्सी नियुक्ती करणेबाबतची जाहिरात**

सातारा जिल्ह्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत One Stop Crises Centre या केंद्राचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी पात्रताधारक एजन्सीची निवड मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थामधून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून करावयाची आहे.

याकरिता कोणती स्वयंसेवी संस्था प्रस्ताव सादर करू शकते तसेच विहित नमुना अर्ज, सविस्तर अटी व शर्ती NIC चे www.satara.gov.in वेबसाईटवर पहाव्यात. संस्थेने परिपूर्ण प्रस्ताव जाहिरात प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून १० (शासकीय सुट्टी वगळून) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, सातारा नवीन प्रशासकीय इमारत २ रा मजला, एस.टी. स्टँडशेजारी, सातारा, ता.जि. सातारा-४१५००१ येथे २ प्रतीमध्ये सादर करावेत.

सही/-
सदस्य सचिव
One Stop Crises Centre समिती
तथा जिल्हा महिला व बाल विकास
अधिकारी, सातारा.

## निवडक

### कोळखेत टायरसह डिस्कची चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्याने दोन लाख ७० हजार रुपये किमतीच्या सहा टायर्ससह डिस्कची चोरी केल्याची घटना कोळखे गाव येथील एका गॅरेजमध्ये घडली. मनोज पासवान (वय ४८) यांचे सुनील मोटार्स गॅरेज असून त्या ठिकाणी १४ टायर असलेली टाटा टोरस मॉडेल या नवीन गाडीची बॉडी बनविण्याकरिता ठेवली होती. या गाडीचे पाठीमागील सहा टायर डिस्कसह अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अपघातात कामगार जखमी

**पनवेल :** बिगारी काम करणाऱ्या कामगाराच्या दुचाकीला धडक बसल्याने तो जखमी झाल्याची घटना कळंबोली सर्कल परिसरात घडली आहे. मुंब्रा-पनवेल रोडवरील कळंबोली सर्कलवर उभ्या असलेल्या दुचाकीला मागून आलेल्या बल्कर गाडीने धडक दिली. यात दुचाकीवरील बिगारी काम करणारा कामगार बबन जाधव हा जखमी झाला आहे. त्याला तातडीने नजीकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कपडे खरेदीच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल :** कपडे खरेदी करण्याच्या बहाण्याने एका भामट्याने २५ हजारां ड्रेस घेऊन पैसे दिले नाही. त्यानंतर तो पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. मोनिका सदानी यांचे खारघर वसाहतीमध्ये एमएफसी हे ब्युटीक असून या ठिकाणी एक भामटा दुकानात कपडे खरेदी करण्याच्या बहाण्याने गेला होता. घरी पाहुणे आले असून त्यांना कपडे पाहिजेत, असे सांगून त्याने वेगवेगळ्या प्रकारचे कपडे काढायला सांगितले व त्यातील ५० ड्रेस निवडून बिल बनविण्यास सांगितले. त्यानुसार मोनिका यांनी २५ हजारांचे बिल बनवून कामगाराकडे दिले. भामट्याने कामगाराला पैसे देण्याच्या बहाण्याने दुकानाच्या बाहेर नेले. त्यानंतर त्याच्याकडून कपडे घेऊन त्याला पैसे न देता रिक्षामधून पसार झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मोनिका यांनी याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### उरण महाविद्यालयात संविधान दिन

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. प्राचार्य के. ए. शामा यांच्या मार्गदर्शनाखालील झालेल्या या कार्यक्रमात प्रा. ए. के. गायकवाड हे प्रमुख मागदर्शक म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ. एम. जी. लोणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व्हि. एस. इंदूलकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रा. एच. के. जगताप, प्रा. रामकृष्ण ठवरे, प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. रियाज पठाण आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे यांनी, तर आभार प्रा. लिफ्टन कुमारी यांनी मानले.

# 'ओमिक्रोन'बाबत सतर्कतेचे निर्देश

## ■ नवी मुंबई पालिका आयुक्तांनी घेतली तातडीने बैठक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दक्षिण आफ्रिकेसह बोटस्वान, हाँगकाँगमध्ये आढळलेल्या ओमिक्रोन या कोविडच्या नव्या व्हेरिएन्टच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेने दक्षता घेण्याचे सूचित केले आहे. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभाग व विभाग अधिकारी यांची वेबसंवादाद्वारे तातडीने बैठक घेत अधिक सतर्कतेने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

कोरोना बाधितांची दैनंदिन रुग्णसंख्या काहीशी कमी झालेली दिसत असली, तरी कोरोना अजून संपलेला नाही हे लक्षात घेत महापालिकेने दैनंदिन कोविड टेस्टींगचे प्रमाण सात हजारापर्यंत राखले आहे. त्यातही ज्या ठिकाणी कोरोनाबाधित आढळतो त्या इमारतीतील, वसाहतीतील प्रत्येकाचे टेस्टींग करून कोरोनाच्या विषाणूला आहे तेथेच रोखण्यासाठी टारगेटेड टेस्टींगवर भर दिला जात आहे. टेस्टींगचे प्रमाण अजिबात कमी होऊ न देता नव्या व्हॅरियेंटच्या पार्श्वभूमीवर



टेस्टींगमध्ये आरटी-पीसीआर टेस्टचे प्रमाण वाढविण्याचे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

कोविड लसीकरणाच्या पहिल्या डोसचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केलेले असले, तरी दुसऱ्या डोसचे सध्या ६७ टक्के साध्य झालेले उद्दिष्ट लवकरात लवकर १०० टक्के पूर्ण करण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले. कोविड लसीकरण मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आयुक्तांनी सूचित केले.

दोन्ही डोस घेतले असले तरी मास्क, सतत हात धुणे व सुरक्षित अंतर या कोविड सुरक्षा त्रिसूत्रीचेच पालन करणे महत्त्वाचे आहे. हे नागरिकांना लक्षात आणून देण्यासाठी विविध सोशल माध्यमांद्वारे याविषयीचा प्रचार वाढवावा, असे सूचित करीत आयुक्तांनी सर्व विभाग अधिकारी यांनी आपापल्या क्षेत्रात कोविड सुरक्षा नियमांचे पालन करण्याविषयी माईकींगद्वारे नागरिकांमध्ये जागरूकता आणावी. नियमांचे उल्लंघन करून सामाजिक आरोग्याला धोका पोहचविणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश दिले. संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आयसीयू बेड्स आणि व्हेंटिलेटर्स सुविधांसह व कार्यवाहीचा आयुक्तांनी आढावा घेतला.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, शहर अभियंता संजय देसाई, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुस्कर, परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी निलेश नलावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण उपस्थित होते. यामध्ये वेबसंवादाद्वारे दोन्ही परिमंडळ उपायुक्त, तसेच आठही विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त आणि सर्व रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधीक्षक, अधिकारी उपस्थित होते.

# पनवेल एसटी आगार अद्याप बंदच

## आतापर्यंत २७ कर्मचाऱ्यांवर कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

एसटी कर्मचाऱ्यांचे विलिनीकरण करावे या मागणीसाठी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल पनवेल आगारातील २७ कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई केली आहे. असे असले तरी सोमवार (दि. २९) पर्यंत आगरातून एकही गाडी सुटलेली नाही.

एसटी कर्मचाऱ्यांचे विलिनीकरण करावे या मागणीसाठी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनामुळे परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी कर्मचाऱ्यांचे शासनात विलिनीकरण करण्याऐवजी त्यांना वेतनवाढ देण्याची तयारी दाखवली. यानंतर कामगार शुक्रवारपर्यंत हजर न झाल्यास त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे जाहीर केले होते. त्याला प्रतिसाद देऊन रायगड जिल्ह्यात महाड आणि पेण आगारातील काही कर्मचारी कामावर हजर झाले असले, तरी पनवेल आगारातील कोणीही कर्मचारी हजर न झाल्याने येथून एकही गाडी सुटलेली नाही.

रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण ही एसटी आगारे मुंबई विभागात येतात. मुंबई विभागात आंदोलक विलिनीकरणाशिवाय माघार घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे या विभागातील सर्व आगारे अद्याप बंदच आहेत. येथून एकही गाडी सुटलेली नाही. शनिवारी पनवेल आगारातील आणखी काही कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आल्याने आतापर्यंत २७ कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई केली आहे.

# सानपाड्यात सुशोभीकरण अभियान राबवा

## भाजप नेते पांडुरंग आमले यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत प्रभाग ७६मध्ये सुशोभीकरण अभियान राबविण्याची मागणी सानपाडा नोडमधील भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

सानपाडा प्रभाग ७६ मध्ये सिडको गृहनिर्माण सोसायट्या व खाजगी सोसायट्यांचा समावेश होत आहे. येथील भागाची तळापासून स्वच्छता करून चोरीला गेलेली अथवा तुटलेली झाकणे असतील, तिथे नवीन झाकणे बसवावीत. मलनिस्सारण वाहिन्यांची डागडुजी करण्यात यावी, मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यावरील सर्वच गृहनिर्माण सोसायट्यांच्या संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर स्वच्छतेविषयी, तसेच आरोग्यविषयक सुभाषिते व प्रबोधनात्मक सुविचार टाकण्यात यावे. परिसरातील मैदानांचे सुशोभीकरण करून त्याचीही रंगरंगोटी करण्यात यावी.

मार्केट, शाळा, रुग्णालये, सार्वजनिक जागा यांच्याही संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करून त्यावरही समाजप्रबोधनात्मक सुभाषिते बसविण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

येथील वॉटर एंट्री अंर्तगत बाहेरील रस्ते व अंर्तगत रस्ते ज्या ज्या ठिकाणी जलवाहिन्यांचा, सोसायटीतील नळांचा दर्शनी भाग असेल त्या त्या ठिकाणी संरक्षक जाळ्या बसविण्यात याव्यात, जेणेकरून त्या ठिकाणीही बकालपणा येणार नाही व जलावहिन्याही सुरक्षित राहतील. प्रभाग स्वच्छतेसाठी जे जे सहकार्य लागेल, ते ते सहकार्य करण्यास आपण सदैव तयार आहोत, असे पांडुरंग आमले यांनी निवेदनात म्हटले आहे.

# माजी सैनिकाला लाखोंचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

एका माजी सैनिकाला व्हेल पॅक पॉली ट्रेडर्स कंपनीत पैसे गुंतवण्यास भाग पाडून त्यांची तब्बल ४७ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. एनआरआय पोलिसांनी फसवणूक करणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले बलवीर रामनिवास सिंह सिकरवार (वय ४०) हे मध्य प्रदेशमध्ये राहाण्यास असून ते ऑगस्ट २०१७ मध्ये भारतीय नौदलातून निवृत्त झाले आहेत. बलवीर यांच्यासोबत भारतीय नौदलात असलेले व सध्या खारघर येथे राहाणारे राजेंद्र सिंग यांच्यासोबत बलवीर यांची त्या वेळी ओळख झाली होती. या ओळखीनंतर राजेंद्र सिंग यांनी डिसेंबर २०१९ मध्ये बलबीर यांना सीबीडी बेलापूर येथे बोलावून त्यांना निवृत्तीनंतर मिळालेली रक्कम पवन अग्रवाल व मोनिका अग्रवाल यांच्या व्हेन पॅक पॉली ट्रेडर्स या कंपनीत गुंतवणूक करण्याचे सुचविले होते.





कंपनी साखरेच्या फ्लॅस्टीक बॅग बनवित असून या कंपनीत गुंतवणूक केल्यास त्यांना चांगला परतावा मिळेल असे आश्वासन त्यांना राजेंद्र सिंग याने त्या वेळी दिले होते. यानुसार बलवीर सिंह यांनी कंपनीत गुंतवले. त्यानंतर राजेंद्र यांनी कंपनीचे ऑडिट सुरू असल्याचे सांगत रक्कम स्वतःच्या खात्यात गुंतविण्यास सांगितले. बलवीर यांनीही स्वतःसह पत्नीच्या खात्यातील रक्कमही राजेंद्र यांच्या अकाऊंटवर पाठविली. राजेंद्र यांनी त्या रकमेतील काही रक्कम बलबीर यांना परताव्याच्या स्वरूपात परत दिली. बिलाच्या तपासणीत कंपनीचा जीएसटी क्रमांक अस्तित्वात नसल्याचे व बँक स्टेटमेंट बनावट असल्याचे बलवीर यांच्या लक्षात आले. त्यानंतर बलबीर यांनी राजेंद्र सिंग, पवन अग्रवाल व मोनिका अग्रवाल यांच्याकडे गुंतवणूक केलेली रक्कम परत मागितली तेव्हा तिघांनीही टाळाटाळ केली. त्यानंतर त्यांनी फसवणूक केल्याचे बलबीर यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते कर्मयोग चिंतन पुस्तकाचे प्रकाशन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मनोहर शहा यांनी लिहिलेल्या कर्मयोग चिंतन या पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी (दि. २९) पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

कोरोनामुळे दोन वर्षानंतर या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व सदस्य एकत्र आले होते. या वेळी कोविड काळात १९ सदस्य स्वर्गवासी झाले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



यासोबत ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात ज्या सदस्यांचा वाढदिवस होता त्या सदस्यांचा भेटवस्तू देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

या वेळी मनोहर शहा, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कांबळे, सोनार मॅडम, जगताप, बगाडे, आशा भगत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# नवी मुंबईत बालकाच्या हृदयावर दुर्मिळ शस्त्रक्रिया

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जन्मजात हृदयविकार असलेल्या नऊ वर्षांच्या एका मुलावर नवी मुंबईतील तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या शल्यचिकित्सा करून त्याचे प्राण वाचविण्यात यश आले आहे.

मुरबाड येथे राहणारा चिन्मय याला जन्मजात हृदयविकार होता, जन्माच्या वेळी चिन्मयचे वजन एक किलो होते. घरची परिस्थिती बेताची असल्याने चिन्मयवर पुढील उपचार झाले नाही. चिन्मयला बोलताना व चालताना धाप लागायची तेव्हा त्याचे पालक स्थानिक डॉक्टरांकडे घेऊन जायचे, परंतु वयाच्या नवव्या वर्षापर्यंत हृदयविकारावर त्यावर उपचार झाले नव्हते. अशातच एकदा त्याच्या मामाची भेट तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलचे बाल हृदय शल्यचिकित्सक डॉ. भूषण चव्हाण यांच्याशी झालीय व या आजाराची माहिती त्यांना देण्यात आली. डॉ. भूषण चव्हाण यांनी तत्काळ त्याला तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टर येथे भरती करून वैद्यकीय चाचण्या केल्या.

याविषयी अधिक माहिती देताना डॉ. भूषण चव्हाण सांगतात, चिन्मयच्या हृदयात दोन समस्या होत्या, पहिली म्हणजे एओर्टिक आर्च ही रक्तवाहिनी असते जी शरीराला शुद्ध रक्तपुरवठा करते ती रक्तवाहिनी दोन भागांमध्ये विभागली होती. त्यामध्ये कनेक्शन नव्हते या समस्येला आम्ही एओर्टिक आर्च इंटरपशन म्हणतो व या रक्तवाहिनीला असलेला जो मुख्य वॉल्व्ह असतो तो संकुचित झाला होता ही दुसरी समस्या होती. अशा समस्यांमध्ये मोठी सर्जरी करण्यात येते, परंतु चिन्मयचे वय लक्षात घेता आम्ही ही शस्त्रक्रिया बिनटाक्याची करावयाची ठरवली. व अशी शस्त्रक्रिया करण्यासाठी अनेक वैद्यकीय बाबी तपासून पाहाव्या लागतात कारण अशा केसेसमध्ये मृत्यूचा धोका अधिक असतो.

पायातून वायर टाकून स्टेण्ट टाकून हृदयातील दोन्ही समस्या सोडविण्यात आल्या, ही शस्त्रक्रिया सलग दोन तास चालली. वैद्यकीय क्षेत्रामध्ये ही सर्वांत कठीण शल्यचिकित्सा मानली जाते. तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलमधील १० जणांच्या टीमने ही शल्यचिकित्सा केली. अत्यंत जोखमीची असलेली ही शस्त्रक्रिया नवी मुंबईतील एक दुर्मिळ शस्त्रक्रिया मानली जाते.

# सीकेटी महाविद्यालयाच्या विज्ञान मंडळातर्फे वेबिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान या महाविद्यालयाच्या विज्ञान मंडळातर्फे ज्या महिलांनी विज्ञानाचा चेहरा बदलला या विषयावर वेबिनारचे आयोजन सोमवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता करण्यात आले होते.

या वेबिनारसाठी प्रमुख पाहुण्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या जैवतंत्रज्ञान प्रमुख प्रो. डॉ. वर्षा केळकर माने होत्या. वेबिनारमध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, डॉ. जे. एस. ठाकूर, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. बी. डी. आघाव, आयक्यूएसी समन्वयक, विज्ञान मंडळाच्या अध्यक्ष पी. एम. जाधव यांची उपस्थिती होती.

प्रा. डॉ. वर्षा केळकर-माने यांनी १८व्या शतकापासून ते आजपर्यंत असणाऱ्या महिला व त्यांनी केलेली कामगिरी याचा थोडक्यात इतिहास सांगितला. राणी जिजाबाई, राहीबाई पोपेरे, कमलादेवी सोहोनी, इरावती कर्वे, शरिदिनी डहाणूकर, सावित्रीबाई फुले अशी अनेक उदाहरणे दिली. पद्मश्री विजेत्या राहीबाई पोपेरे यांच्याबद्दल वर्णन केले. राहीबाई यांनी जोपासलेले बी-बियाणे, रोपे यांचा अभ्यास आणि त्याची लागवड ह्याबद्दल सांगितले. तसेच कमलादेवी सोहोनी यांच्या शैक्षणिक, शरिदिनी डहाणूकर यांच्या वैद्यकीय कार्याचे वर्णन केले.

या सर्व महिलांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला, परंतु तरीही त्यांनी यशाची शिखरे गाठली. अशा प्रकारे प्रा. डॉ. वर्षा केळकर-माने यांनी विज्ञान क्षेत्रातील विविध महिलांनी केलेल्या भरीव कामगिरीबद्दल जागरूकता निर्माण केली, तसेच त्यांनी ह्या सर्व महिलांच्या कामगिरी बघून आपणही प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन केले. प्रा. डॉ. वर्षा केळकर-माने यांच्या प्रतिपादनामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना प्रोत्साहन मिळाले आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. वर्षा केळकर-माने यांचे आभार मानले.





# वेस्टर्न महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा येथील विश्वेश्वर एज्युकेशन सोसायटी संचालित वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट येथे शुक्रवारी (दि. २६) महाराष्ट्र छात्र सेना (एनसीसी) व राष्ट्रीय सेवा विभाग (एनएसएस) तर्फे संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. सुशिल शांताराम जाधव, तसेच अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुसी कुरियाकोसे उपस्थित होते.

प्रा. सुशिल जाधव यांनी भारतीय संविधान दिन साजरा करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. त्याचप्रमाणे त्यांनी संविधान म्हणजे काय? महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संविधान लिहिण्याचा उदात्त हेतू व योगदान, मूलभूत कर्तव्ये, मूलभूत हक्क, संविधानाची श्रेष्ठता, मूल्यात्मकता व उदार व्यापकता ही प्रत्येक नागरिकाने समजून घेणे किती महत्त्वाचे आहे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र छात्रसेना विभागाचे प्रमुख प्रा. प्रधान, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख डॉ. बेचू लाल, तसेच प्रा. बर्कत्तुनीसा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला २०० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी सिद्धेश काकडे आणि निकिता ठाकूर यांनी यशस्वीरीत्या केले, तर आभार राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. लाल यांनी मानले.

# उरणमध्ये आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे, त्यांचे जीवन सुखी, आनंदी व्हावे व आरोग्यविषयक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून रविवारी (दि. २८) तेरापंथी हॉल येथे अमन पॉलिक्लिनिक व क्वीन्स केअर क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

शिबिरात इसीजी, बीपी, डायबेटीस, बीएमडी आदींची मोफत तपासणी या शिबिरात करण्यात आली. तर विविध रोग व त्या रोगावर उपाययोजना याबाबत मोफत मार्गदर्शन तज्ज्ञ डॉक्टरद्वारे करण्यात आले. हेलपिंग स्टार फॉउंडेशन अंतर्गत सुरू असलेल्या अमन पॉलिक्लिनिकचे हे तिसरे वर्ष असून क्वीन्स केअर क्लिनिक यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी जास्तीत जास्त



फायदा घेतला.


डॉ. आतिफ मोहिनतुले, डॉ. तारीफ सुर्वे, डॉ. कनक मिश्रा, डॉ. तालिब सुर्वे, डॉ. नितीन जैन, डॉ. जास्मिन सुर्वे, डॉ. मुद्दशिर राऊत, सामाजिक कार्यकर्ते अब्रार शिलोत्री, संतोष पवार, अखलाख शिलोत्री, मिलिंद पाडगावकर, आयजास मुकादम, हनिफ भाटकर, अलीम भाईजी, अफशा मुकरी आदी या वेळी उपस्थित होते.

# खारघरमध्ये ई-कचरा कलेक्ट मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील संजीवनी इंटरनॅशनल स्कूल प्रशासनाने विद्यार्थ्यांद्वारे स्कूल परिसरातील ई-कचरा गोळा करण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे.

मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वंदना सक्सेना आणि निशिगंधा देवरे (क्लायमेट ॲक्शन प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर) यांनी विद्यार्थ्यांकडून इलेक्ट्रॉनिक कचरा गोळा करण्याची मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरातून आणि परिसरातून ई-कचरा गोळा करून स्कूलमध्ये जमा केला.



यात प्रिंटर, लॅपटॉप, जुने फोन, इअर फोन, चार्जर, कॉम्पॅक्ट डिस्क आदींचा समावेश आहे.

## संपादकीय

# भीतीची नवी लाट

मुंबई विमानतळावर १० नोव्हेंबरपासून हजारभर प्रवासी दक्षिण आफ्रिकेतून आलेले आहेत असा भीतीदायक गौप्यस्फोट पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी सोमवारी केला. या हजार प्रवाशांमधील किती जणांना कोरोनाची बाधा झाली आहे याचा पत्ता काही महाराष्ट्राच्या आरोग्य खात्याला अद्याप लागलेला नाही. खरे तर अशा घोषणा करून नागरिकांमध्ये घबराट पसरवणे जबाबदार पदांवरील मंडळींनी टाळायला हवे. ही वेळ लोकांना धीर देण्याची असते, घाबरवण्याची नव्हे. परंतु कोरोनाची घबराट माजवून गेली दोन वर्षे सत्ताधारी आघाडीतील संधीसाधू स्वतःचे उखळ कसे पांढरे करून घेत आहेत हे सारे जाणतातच.

**कसेबसे आगीतून बाहेर यावे आणि फुफाट्यात पडावे अशी साऱ्या जगाची अवस्था झाली आहे. कोरोनाच्या तीन-चार लाटा अनेक देशांनी सहन केल्या, ज्यात लाखो माणसे जिवानिशी गेली. सुदैवाने भारताच्या वाट्याला गेल्या दोन वर्षांच्या या काळात दोनच लाटा आल्या, पण त्याची जबरी किंमत भारतीय नागरिकांनी मोजली आहे. आता आता कुठे सारे काही सुरळीत होण्याच्या दिशेने सरकत असताना, ओमिक्रॉन या कोरोनाच्या नव्या अवताराने संपूर्ण मानव जातीलाच वेठीस धरले आहे असे दिसते. कोरोना विषाणूचा हा नवा उत्परिवर्तित अवतार दक्षिण आफ्रिकेमध्ये दोन आठवड्यांपूर्वी पहिल्यांदा आढळला. गेल्या १०-१५ दिवसांतच या विषाणूने १०-१२ देशांमध्ये हातपाय पसरल्याचे दिसून आल्याने अनेक देशांनी दक्षिण आफ्रिकेवर निर्बंध आणले आहेत. तेथून येणाऱ्या प्रवाशांना रोखण्याचे प्रयत्न सुरू झाल्याने तेथील विमानतळांवर गोंधळाची परिस्थिती असून तेथे कडक लॉकडाऊनचीही शक्यता दिसते आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ओमिक्रॉन हा कोरोनाचा उत्परिवर्तित अवतार सर्वाधिक धोकादायक ठरू शकतो, असा इशारा दिला आहे, मात्र दक्षिण आफ्रिकन संशोधकांनी शोधून काढलेला हा विषाणू नेमका कितपत धोकादायक आहे हे अद्याप पुरेसे ज्ञात नाही. या विषाणूमुळे मृत्यूदरात वाढ होणार का याचेही उत्तर अद्याप मिळालेले नाही. कोरोनाप्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतले तरी हा विषाणू आपला कार्यभाग साधतो अशी भीती काही युरोपीय देशांतील संशोधकांनी व्यक्त केली आहे, परंतु त्यालाही पुष्टी देणारे संशोधन अजून व्हायचे आहे. ओमिक्रॉन हा विषाणू स्वत:चे रूप भराभरा बदलत आपले हातपाय पसरतो, परंतु बळी घेण्याची त्याची क्षमता अजूनही मोजण्यात आलेली नाही. ओमिक्रॉनच्या काही देशांतील थैमानाच्या बातम्या येऊन थडकत असतानाच आपल्या पर्यटनमंत्र्यांनी दक्षिण आफ्रिकेतून हजारभर प्रवासी मुंबईत आल्याचा गौप्यस्फोट केला. पर्यटन मंत्र्यांनी केलेल्या या गौप्यस्फोटामुळे महाराष्ट्रातील नागरिकांचे धाबे दणाणले आहे हे ओघाने आलेच. कोरोनासारख्या संकटाचे संधीमध्ये रूपांतर केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी दोन दिवसांपूर्वीच स्वत:ची पाठ थोपटून घेतली होती. संकटाचे रूपांतर उखळ पांढरे करून घेण्याच्या संधीमध्ये केल्याचा टोमणा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी लगावला, तो पुरेसा झोंबणारा आहे. भीतीचे राजकारण करून स्वत:ची दुकाने चालवण्याचे उद्योग गेल्या दोन वर्षांत अनेकांनी केले. त्याला चाप लावण्याचा प्रयत्न राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीच्या नेतृत्वाने करायला हवा ही अपेक्षा चुकीची म्हणता येणार नाही. ओमिक्रॉनची भीती दाखवून पुन्हा एकदा जनतेची लुबाडणूक करणाऱ्यांना कायद्याचा बडगा दाखवून समर्थपणे येणारी परिस्थिती हाताळण्यासाठी आरोग्ययंत्रणेने तयार राहावे एवढीच जनसामान्यांची अपेक्षा आहे.**

# कोरोनाची भीती संपली का? मेळावे आणि लग्नसराई जोरात

**खबरबात**
**महेश शिंदे**

ओमाय गॉड... ओमिक्रॉन आलाय! जगावरील कोरोनाचे संकट दूर होतंय ना होतंय, तोच कोरोनाच्या नवीन भावाचा जन्म झाला आहे. कोरोनाचा नवा वेरियंट ओमिक्रॉनने आफ्रिका खंडात धुमाकूळ घातला आहे, मात्र आपल्याकडे कोरोना कधीच गायब झाला आहे, असा मोठा गैरसमज झाला आहे. समाजात कोरोनाची भीती संपल्यामुळे मास्क, सॅनिटायझर वापरणे, सोशल डिस्टन्सिंग पाळणे लोकांनी सोडून दिले आहे. लग्नसमारंभ, सभा, कार्यक्रम जोमाने सुरू झाले आहेत, मात्र पुन्हा तेच दिवस येऊ घातले आहेत. आम्ही शस्त्रे कधीच म्यान केली आहेत, नुसती म्यान केली नाहीत तर ती माळ्यावरही टाकून दिली आहेत. गेली दोन वर्षे शासकीय बंधने आणि नियमांच्या चौकटीत सुरू असलेल्या सर्व गोष्टीं आता बिनबोभाट सुरू झाल्या आहेत. लग्न सोहळ्यांनी आता जल्लोषाचे वातावरण निर्माण केले आहे. कोरोना पळून गेला आणि लग्नातील खालूबाजाचा ढाकमुकुम आवाज सुरू झाल्याने निर्माण झालेले निराशामय वातवरण आता बदलू लागले आहे. यामुळे व्यावसायिकदेखील आनंद व्यक्त करू लागले आहेत.



कोरोनाने भारतात पाऊल टाकल्यानंतर भययुक्त वातावरण निर्माण झाले होते. शासनाने कोरोना आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्याकरिता दैनंदिन जीवनशैली बदलावी लागली. व्यवसाय, नोकरी, दुकाने सारे काही बंद ठेवण्यात आले. चित्रपटगृहे, सार्वजनिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रम रद्द करण्यात आले. त्याकरिता नियामवली तयार करण्यात आली. यामुळे गेली दोन वर्षे नियमांच्या चौकटीत लग्नसोहळे पार पडत होते. तर अनेकांनी ऑनलाइन पद्धतीनेदेखील लग्न उरकून टाकले. कोरोना महामारी काही केल्या कमी होत नसल्याने शासनानेही कठोर पावले उचलली होती. त्यामुळे सर्वच स्तरावर निराशाजनक वातवरण निर्माण झाले होते. आता परिस्थिती




आटोक्यात आली असल्याने शासनाने संचारबंदीमध्ये शिथिलता आणली आहे. त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात शॉपिंग मॉल, सिनेमागृह, प्रवासी वाहने, बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रम, राजकीय सभादेखील सुरू झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर नियमांच्या चौकटीत सुरू असलेले लग्नसोहळे आता धुमधडाक्यात सुरू झाले आहेत. दीपावलीमध्ये तुळशी विवाह होताच लग्नाचे बार उडू लागले आहेत. शहरात असलेल्या सभागृहात आता वऱ्हाडी मंडळींची गजबज सुरू झाली आहे. विजेच्या रोषणाईने वर आणि वधूकडील इमारतीदेखील प्रकाशित झाल्या आहेत. तर खालूबाजा आणि डीजेचा आवाजदेखील घुमू लागल्याने वऱ्हाडी मंडळींचे पाय संगीताच्या तालावर नाचू लागले आहेत. लगीनसराई सुरू झाल्याने व्यावसायिकांनीदेखील समाधान व्यक्त केले असून कापड, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, फुलांची मागणी वाढत आहे. त्याचबरोबर सोन्याच्या दागिन्यालादेखील झळाली आली आहे. कोरोनामुळे लग्न सोहळ्यांवर अवलंबून असलेले खालूबाजा वादक, डीजे वादक, मंडप डेकोरेटर, कॅटरिंग, फोटोग्राफी अशा विविध व्यावसायिकांना सोन्याचे दिवस आले आहेत. दोन वर्षात उपासमारीची पाळी येऊन ठेपलेल्या या व्यावसायिकांमध्ये लगीन सराई सुरू झाल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेली दोन वर्षे कोरोना महामारीमुळे लावण्यात आलेल्या निर्बंधांमुळे लग्न सोहळे बंद होते. काही जणांनी लग्नाची बोलणी केली मात्र लगेचच लॉकडाऊन लागले. त्यामुळे ठरलेले विवाह आणि ज्यांना लग्न करण्याची इच्छा होती अशा तरुण-तरुणींना लॉकडाऊनमध्ये घरातच बसण्याची पाळी आली. काहींनी मोजक्याच नातलगांना घेत लग्न सोहळा उरकून घेतला. संगीत आणि कोणतीच खरेदी न करता मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत लग्नसोहळे पार पडले. आता पुन्हा नव्याने लग्नांचा आनंद आणि जल्लोष सुरू होत असल्याने दोन वर्षे निर्माण झालेली मरगळ दूर होण्यास सुरुवात झाली आहे. हे होत असतानाच तिसऱ्या संकटाची चाहूल लागली आहे. आफ्रिकेतून कोरोनाचा नवा विषाणू आता झपाट्याने जगभर पसरत आहे. पुढारलेल्या देशांनी आफ्रिकेतून येणारी विमान सेवा बंद केली आहे, मात्र विकसनशील असलेल्या आपल्या भारत देशाला ही विमान सेवा आतातरी बंद करणं परवडणार नाही. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या प्रत्येकावर नजर ठेवणे, हे आता प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य झाले आहे. गाफील न राहता, सावध राहण्याची गरज आहे. लसीकरण करून घ`ण`, मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग यांचे पुन्हा एकदा काटेकोर पालन करणे गरजेचे झाले आहे. ओमिक्रॉन हा विषाणू व त्याचा संसर्गाचा वेग खूपच भयानक आहे, तसेच याची लागण झालेल्या रुग्णांना कोणती उपचारपद्धती द्यायची याची कोणालाच कल्पना नाही. मागील परिस्थिती पाहता ऑक्सिजन, बेड यांची जर संख्या कमी पडली तर या वेळीदेखील मृत्यूचे प्रमाण वाढू शकते. याचे सरकारने आताच नियोजन करणे गरजेचे आहे. आरोग्य व्यवस्था सक्षम करून लोकांमध्ये जनजागृती करून या संकटाशी यशस्वी लढाई लढता येणार आहे. तशी पावले सरकारने उचललीदेखील आहेत, मात्र वेळेची कमतरता पाहता नियोजनाचा वेग वाढवणे गरजेचे आहे.

# पतसंस्थांचे आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी संचालकांनी नियामक मंडळाचे अधिकार वापरावेत

## सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील यांचे प्रतिपादन

**मुरूड : प्रतिनिधी**

पतसंस्थांचे संचालक हे ठेवीदारांचे विश्वस्त असून त्यांची जबाबदारी मोठी आहे. पतसंस्थांचे आर्थिक स्थैर्य टिकविण्यासाठी संचालकांनी नियामक मंडळाचे अधिकार काटेकोरपणे वापरले पाहिजेत, असे प्रतिपादन मुरूड तालुका सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील यांनी केले.

सहकार सप्ताहानिमित्त मुरूड येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था, सहाय्यक निंबधक सहकारी संस्था आणि सहकार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात



(छाया : संजय करडे)

श्रीकांत पाटील उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. नियामक मंडळाने एनपीए, सीडी रेशो, सीआरआर, एसएलआर रेशो याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत श्रीकांत पाटील यांनी व्यक्त केले.

जिल्हा फेडरेशनचे उपाध्यक्ष दिलीप जोशी आणि श्रीराम पतसंस्थेचे चेअरमन ॲड. मोहन तांबडकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात रायगड जिल्हा सहकार भारती सचिव प्रा. मेघराज जाधव यांनी सहकार भारतीचे महत्त्व विशद केले. सहकार सप्ताहानिमित्त सर्व पतसंस्थांच्या अध्यक्षांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन या वेळी सत्कार करण्यात आला. या वेळी प्रा. दीपक पालशेतकर, ललीत जैन, ॲड. घाग, वासंती उमरोटकर, बाळकृष्ण कासार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना पाटील यांनी समर्पक उत्तरे दिली.

श्रीराम पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन दिलीप जोशी यांच्यासह मुरूड तालुक्यातील जय श्रीराम नागरी पतसंस्था, महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था, प्रभात ग्रामीण सहकारी पतसंस्था, कोर्लई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, वाल्मिकी सहकारी पतसंस्था, काळभैरव नागरी पतसंस्था, मर्चंट क्रेडिट सोसायटी, आदर्श पतसंस्था व परस्पर सहकारी पतसंस्था या १० पतसंस्थांचे संचालक या वेळी उपस्थित होते.

श्रीराम पतसंस्थेचे महाव्यवस्थापक संजय ठाकूर व कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# भरकटलेल्या मुलीला सुखरूप दिले आई-वडिलांच्या ताब्यात

## वडखळ पोलिसांची कामगिरी

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ नाक्यावर सायंकाळी गस्त घालताना अचानक आढळून आलेल्या १० ते ११ वर्षाच्या मुलीला सुखरूप तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात वडखळ पोलिसांना यश आले आहे.

वडखळ पोलीस ठाण्याचे बिट मार्शल पोलीस नाईक पवार गस्तीवर असताना त्यांना बाजारपेठेत अंदाजे १० ते ११ वर्षांची मुलगी घाबरलेल्या अवस्थेत दिसली. विचारणा केली असता तिने नाव आणि वय सांगितले. घर सोडून आल्याचेही तिने सांगितले. ही मुलगी अल्पवयीन असल्याने


(छाया : अनिस मनियार)

पवार यांनी तिला लागलीच वडखळ पोलीस ठाण्यात नेऊन निरीक्षक बाळा कुंभार यांच्या समोर हजर केले.

पोलीस हवालदार दीपाली शिंदे यांच्या मदतीने या मुलीला विश्वासात घेऊन तिच्या आई वडिलांची माहिती घेण्यात आली आणि समाजसेविका रेखाताई तांडेल यांच्या समक्ष समुपदेशन करून या मुलीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले.

# शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांची जयंती वावळोली येथे साजरी

## जीवनपट व आठवणींना उजाळा

**पाली : प्रतिनिधी**

कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ व सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांची ११२ वी जयंती वावळोली येथील आदिवासी आश्रमशाळेत साजरी करण्यात आली. या वेळी विद्यार्थी व शिक्षकांनी दादासाहेबांचा जीवनपट व आठवणींना उजाळा दिला. या वेळी महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

पूजा काष्ठे या दहावीच्या विद्यार्थिनींने आपल्या भाषणातून दादासाहेब लिमये यांचा जीवनपट मांडला. आदिवासी सेवा मंडळाचे अध्यक्ष रवींद्र लिमये, माध्यमिक मुख्याध्यापिका सविता सावंत व प्राथमिक मुख्याध्यापक दिनेश इंगळे यांचे या वेळी विशेष मार्गदर्शन लाभले. अधीक्षक एम. एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अधीक्षिका एस. बी. मुरकुटे, संतोष पाटील, संदीप पाटील, अजय माळी यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ या कार्यक्रमास उपस्थित होते.



# गॅसवाहिनी जोडण्याविषयी पेणमध्ये जनजागृती

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील ग्राहकांना पाईपलाईनद्वारे गॅसपुरवठा करण्यात यावा यासाठी मंचातर्फे महानगर गॅस व्यवस्थापनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे अशी माहिती जनजागृती ग्राहक मंचाच्या पेण शाखेचे प्रमोद जोशी यांनी रविवारी (दि. २८) दिली.

गॅसवाहिनीविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने जनजागृती ग्राहक मंच पेण शाखेच्या वतीने शहरातील चावडीनाका येथील गणपती मंदिरात मार्गदर्शन करण्यात आले. त्या वेळी जोशी बोलत होते. सोसायटीला किंवा व्यक्तिगत गॅसजोडणी हवी असेल, तर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले. ग्राहक मंचाचे जिल्हा सदस्य गणेश जोशी, माजी सभापती सुधीर जोशी, राजेंद्र जोशी, विकास दातार, विभावरी जोशी, दत्ता मोघे, अंजली जोशी, विक्रम म्हात्रे आदी सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते.

# पालीत संविधान गौरव दिन उत्साहात

## डॉ. आंबेडकर रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**पाली : प्रतिनिधी**

देश वाचवायचा असेल तर संविधान वाचवलेच पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. सुनील देवरे यांनी येथे केले. संविधान गौरव दिनानिमित्त बौद्ध समाज युवा संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी त्यांनी भारताचे संविधान अभ्यासपूर्ण शैलीत आणि समर्पक शब्दात समजावून सांगितले.


(छाया : धम्मशिल सावंत)

राजेंद्र वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय सोनवणे, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते व्ही. के. जाधव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले, तसेच संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी गायक प्रभाकर ओव्हाळ, अक्षता बिनेदार यांनी केले. सर्व धार्मिक ग्रंथांपेक्षा भारतीय संविधान हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे, असे प्रतिपादन रोह्याचे नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी केले. डॉ. संजय सोनावणे यांनी बौद्ध समाज युवा संघाच्या वाचनालय निर्माणासाठी अडीच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. तहसीलदार दिलीप रायन्नावार, सामाजिक कार्यकर्ते विवेक सुभेकर, विशाल जगताप, प्रवीणकुमार बागुल, उद्योजक भगवान बिनेदार, डॉ. शंतनु आठवले यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

भन्ते अभिचिंतो, भन्ते सुमेध बोधी, दीपिका चिपळूणकर, नगरसेवक महेश कोल्हटकर, डॉ. सुधाकर मोरे, सामाजिक कार्यकर्ते सुधीर कलबास्कर, हभप महेश पोंगडे महाराज यांच्यासह ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते.

बौद्ध समाज युवा संघाचे संस्थापक रमेश शिंदे, अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, सचिव नरेश गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश गायकवाड, कोषाध्यक्ष दीपक दाभाडे, कार्याध्यक्ष राजेंद्र वाघमारे, महिला अध्यक्षा राजेश्री दाभाडे, संतोष गायकवाड, प्रशिक बिनेदार, प्रभाकर ओव्हाळ, सुरेंद्र शेलार, मुकेश सकपाळ, रोहिणी जाधव, सुनीता झेंडे, अमोल वाटवे, रवींद्र गायकवाड, सुविनयकुमार अहिरे यांच्यासह सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# पाली-झाप-बलाप बायपास मार्ग भूसंपादन प्रक्रियेत शेतकरी आक्रमक

## मोजणीसाठी आलेल्या ठेकेदार, अधिकाऱ्यांना पिटाळले

**पाली : प्रतिनिधी**

पाली-झाप-बलाप बायपास मार्गासाठी भूसंपादन करण्यास स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असून, त्यांनी मोजणीसाठी आलेल्या अधिकारी व ठेकेदाराला पळवून लावले.

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीतील सातत्याने वाहतूक कोंडीचा तिढा सोडवण्यासाठी बायपास मार्गाचा पर्याय उभा केला जात आहे. मात्र नव्याने होऊ घातलेल्या पाली-झाप-बलाप बायपास मार्ग हा आमच्या दुबार पिकी शेतजमिनी उद्ध्वस्त करणार असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे. जमीन मोजणीसाठी आलेले भूमिअभिलेख कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांना बुरमाळी येथील शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण होत नाही तोपर्यंत कुणालाही शेतात पाय ठेऊ देणार नाही, असे स्थानिक शेतकऱ्यांनी मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना ठणकावले.

पाली, झाप, बुरमाळी येथील शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत, सदर बायपास मार्गाला कडाडून विरोध दर्शविला आहे. बायपाससाठी इतर पर्यायी जागा शोधा किंवा मुंबई, पनवेल व ठाणे आदी शहराप्रमाणे उड्डाण पूल बांधा, अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे.

या प्रक्रियेत धनदांडगे, राजकीय पुढारी, बडे उद्योजक यांना सोयीस्कररीत्या अभय दिला जात आहे, तर गोरगरीब शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनीवर बुलडोझर फिरविण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी व नागरिकांनी केला.

सदर बायपास मार्गाकरिता यापूर्वी मोजणी व सर्व्हे करण्यात आला होता, मात्र काही मोजक्या धनिक लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी सदर मार्ग वळविण्यात आला आहे, हा डाव आम्ही उधळून लावू, असा इशारा शेतकरी मंगेश कदम यांनी दिला. सरकारने शेतकऱ्यांच्या भावनेचा विचार करावा अन्यथा उग्र आंदोलन छेडू, असे सुजित काटकर यांनी सांगितले.

रमेश लखीमळे, मंगेश कदम, लक्ष्मण कांबळे, पांडू राऊत, श्रीरंग काटकर, सुजित काटकर, बाळकृष्ण लखीमळे, वसंत गडगे, तुकाराम गडगे, विठ्ठल ठोंबरे, अनंत लांगी, बाळू काटकर, सुरेश गायकवाड, बाळा परब, यशवंत काटकर, उमाजी राऊत, जयंता गडगे, दत्तात्रेय गोळे, दीपक चव्हाण, सीताराम जाधव, निलेश जाधव, जितेंद्र गद्रे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया : धम्मशील सावंत)

**प्रशासनस्तरावर बैठका घेऊन शेतकऱ्यांची बाजू समजून घेतली आहे, सदर भूसंपादनासाठी लागणाऱ्या जागेच्या मोजणीकरिता भूमिअभिलेख कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत फी भरली आहे. त्यानुसार मोजणीची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, सध्या शेतकऱ्यांच्या तक्रारी येत असून त्यांचे निवारण करण्यासाठी प्रशासनस्तरावर आम्ही प्रयत्न करू.**

**-दिलीप मदने, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाली-सुधागड**

**पालीतील वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लावण्यासाठी पाली-झाप-बलाप यामार्गे बाह्यवळण मार्ग निर्माण होत आहे. भूसंपादन प्रक्रियेसंबंधी तक्रारी असलेल्या शेतकऱ्यांसमवेत बैठक लावून त्यांची बाजू समजून घेतली होती, आजही काही तक्रारी असतील, तर बैठकीचे नियोजन करून योग्य तोडगा काढला जाईल.**

**-दिलीप रायन्नावार, तहसीलदार, पाली-सुधागड**

# कर्जतमधील एसटी बसेस अद्यापही आगारातच; कर्मचारी संपावर ठाम

## १४ हंगामी कामगारांची सेवासमाप्ती, तर २७ कर्मचाऱ्यांचे निलंबन

**कर्जत : बातमीदार**

शासनात विलिनीकरण करावे या प्रमुख मागणीसाठी राज्यातील एसटी कर्मचारी ७ नोव्हेंबरपासून संपावर गेले आहेत. त्यामुळे कर्जत आगारातून आजपर्यंत एकही एसटी बस रस्त्यावर आली नाही. दरम्यान, पगारवाढ दिल्यानंतरही संपात सहभागी असलेल्या कर्जत आगारातील १४ रोजंदारी कर्मचाऱ्यांची सेवा राज्य परिवहन महामंडळाने समाप्त केली, तर २७ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.



(छाया : संतोष पेरणे)

कर्जत एसटी आगारातील वाहक, चालक आणि यांत्रिकी कामगार कामबंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. या आगारात तीन कामगार संघटना होत्या, संपात सहभागी होण्यावरून दबाव येत असल्यामुळे पदाचे राजीनामे देऊन त्यांनी संपात भाग घेतला आहे. त्यामुळे पेण रामवाडी येथील जिल्हा वाहतूक नियंत्रकांनी १० नोव्हेंबर रोजी कर्जत आगारातील पाच कामगारांचे निलंबन केले होते, तर २० नोव्हेंबर रोजी १४ रोजंदारी कामगारांची सेवा समाप्त केली.

राज्याच्या परिवहनमंत्र्यांनी पगारवाढीचा निर्णय जाहीर केल्यानंतरही कामावर रुजू न झालेल्या २२ कर्मचाऱ्यांचे कर्जत आगार प्रमुखांनी निलंबन केले आहे. दरम्यान, शासनाने कामावर रुजू होण्यासाठी अल्टिमेटम दिल्यानंतर कर्जत आगाराच्या प्रशासन विभागातील काही कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत, तर ४६ पैकी केवळ दोन वाहक कामावर हजर झाले आहेत. उर्वरित कर्मचाऱ्यांनी अजूनही संपात सहभाग कायम ठेवल्याने कर्जत आगारातून आजपर्यंत एकही एसटी बस रस्त्यावर आली नाही.

# मुरूड आगारातून पहिली बस रवाना



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

कर्मचारी संपावर गेल्यामुळे मुरूड एसटी आगारातून एकही बस सुटत नव्हती, मात्र सोमवारी (दि. २९) सकाळी मुरूड-अलिबाग बस सोडण्यात आली. या बसचे चालक व्ही. के. म्हस्के व वाहक प्रकाश दांडेकर यांना प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. आगार व्यवस्थापक सनील वाकचौरे, कीर्ती शहा, इर्शाद कादरी, जावेद गोंडेकर व प्रवासी या वेळी उपस्थित होते.

**संपावर असलेल्या आगारातील २७ कर्मचाऱ्यांवर निलंबनाचे आदेश बजावण्यात आले आहेत. जसजसे कार्मचारी उपलब्ध होतील तशा बस सोडण्यात येतील.**

**-सनील वाकचौरे, आगार व्यवस्थापक, मुरूड**

# दुचाकीची म्हशीला ठोकर; उद्योजकाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

कशेळे-कर्जत रस्त्यावरील टाकवे गावाच्या हद्दीत दुचाकीने म्हशीला ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात कशेळे गावातील उद्योजक शंकर ठोंबरे यांचा मृत्यू झाला.

कशेळे येथील शंकर ठोंबरे हे मुलांच्या शिक्षणासाठी कर्जत मुद्रे येथे राहतात. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता कशेळे येथील हॉटेल बंद करून ते आपल्या दुचाकीवरून मुद्रे येथील घरी येत होते. टाकवे गावाच्या हद्दीत त्यांच्या दुचाकीसमोर काही म्हशी आडव्या आल्या. त्यांना दुचाकीने ठोकर दिली. या अपघातात शंकर ठोंबरे गंभीर जखमी झाले. त्यांना नवी मुंबई येथील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रविवारी (दि. २८) त्यांचा मृत्यू झाला.

### म्हशींना रेडियम पट्ट्या लावा...

शक्यतो काळ्या रंगाच्या म्हशी या रात्रीच्या वेळी वाहनचालकांना लांबून दिसत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी दुचाकी, चारचाकी वाहनांनी म्हशींना ठोकर दिल्याने अपघात झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. कर्जत तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात दुग्धव्यवसाय करतात. या व्यवसायासाठी लागणाऱ्या म्हशी या अनेकदा रस्त्यावरून जातात. त्यामुळे म्हशींच्या शिंगांना किंवा पाठीवर पांढऱ्या आणि लाल रंगाचे रेडियम चिटकवावे, अशी सूचना कशेळे येथील सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील यांनी केली आहे. प्रशासनाने या मागणीवर शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन पाटील यांनी केले आहे.

# कर्जतचे आंबा बागायतदार पीकविम्यापासून वंचित

## रक्कम देण्यास कंपनीची टाळाटाळ

**कर्जत : बातमीदार**

आंबा पिकाच्या नुकसानीसाठी शासन पीकविमा योजना जाहीर करीत असते. गतवर्षी विमा काढलेल्या कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना आंबा पिकाची नुकसानभरपाई मिळाली नाही. मागील वर्षीही त्यांना नुकसानभरपाई मिळाली नव्हती. त्यामुळे हे शेतकरी चिंतेत आहेत.



कर्जत तालुक्यात फळ बागायती करणारे शेतकरीदेखील मोठ्या प्रमाणात आहेत. मागील काही वर्षांत हवामानात होणारे बदल हे प्रामुख्याने फळ बागायतदारांच्या पिकांची नुकसानी करणारे ठरत आहेत. ते लक्षात घेऊन कर्जत तालुक्यातील शेतकरी पीकविमा काढू लागले आहेत. २०२० मध्ये तालुक्यात ८८० शेतकऱ्यांनी आपल्या बागायतीचा पीकविमा काढला होता. मागील वर्षी गारपीट आणि हवामान बदलाचा मोठा फटका कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना बसला आणि त्यात बागायतीमधून जेमतेम १० टक्के माल सुस्थितीत शेतकऱ्यांच्या हाताशी लागला. झालेली नुकसानी लक्षात घेता विम्याची रक्कम मिळेल अशी अपेक्षा होती, मात्र शासनाने नेमलेल्या विमा कंपन्यांनी कर्जत तालुक्यातील आंबा पीक उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून रक्कम अद्याप दिलेली नाही. विमा कंपन्यांनी विमा काढूनदेखील पाठ फिरवली असल्याने बळीराजा संकटात आला आहे.

**वर्षाचा कालावधी लोटला तरी विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली नाही. विमा कंपन्या आता ढुंकूनदेखील पाहत नसल्याने शेतकरी हतबल झाला असून आम्हा शेतकऱ्यांना एकत्र येऊन विमा कंपन्यांवर गुन्हा दाखल करावा लागेल.**

**-विनय वेखंडे, प्रगत शेतकरी, कर्जत**

# रायगडकर दुसरा डोस घेण्यास उदासीन



### *पहिला डोस घेतलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण*

*पनवेल ५६.७८ टक्के, उरण ९९.५८ टक्के, खालापूर ८४.०२ टक्के, कर्जत ९७.३६ टक्के, पेण १०७.७१ टक्के, अलिबाग ८९.१५ टक्के, मुरूड ८२.९५ टक्के, माणगाव ७१.४६ टक्के, तळा ९०.१४ टक्के, रोहा ९४.२४ टक्के, सुधागड ७२.९३ टक्के, श्रीवर्धन ८३.५० टक्के, म्हसळा ७१.६२ टक्के, महाड १०३.०३ टक्के आणि पोलादपूर १०७.१३ टक्के पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण झाले आहे. सुधागड, माणगाव, पनवेल आणि म्हसळा तालुक्यात लसीकरणाचे प्रमाण कमी आहे. पनवेल मनपा हद्दीतील ९७.३३ टक्के नागरिकांचे लसीकरण झाले आहे, तर उर्वरीत रायगडमधील ८४.८८ टक्के लोकांनी पहिला डोस घेतला आहे अशा एकूण ८८.४४ टक्के लोकांनी लस घेतली आहे.*

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होताच नागरिकांमधील बेफिकिरी वाढल्याचे दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यात ८८ टक्के नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक लशीचा पहिला डोस घेतलेला असताना केवळ ४५ टक्के लोकांनीच दुसरा डोस घेतला आहे. जिल्ह्यातील सुमारे दोन लाख नागरिक आजही लसीकरणापासून दूर आहेत.

कोरोना प्रतिबंधक लसीकरण सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यात जिल्ह्यात खूपच कमी प्रतिसाद मिळत होता. शासन आणि प्रशासनाच्या वतीने जनजागृती झाल्यानंतर लसीकरणाचा वेग वाढला तेव्हा लस घेण्यासाठी लसीकरण केंद्रांवर अक्षरशः झुंबड उडत होती. पहाटेपासून रांगा लावूनदेखील नागरिकांना लस न घेताच निराश होऊन परतावे लागत होते. त्यानंतर काही सामाजिक संस्था, कार्यकर्ते पुढे आले. त्यांनी आपल्या माध्यमातून लसीकरणाला सुरुवात केली. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पहिला डोस उपलब्ध झाला.

जिल्ह्यातील २९ लाख ८३ हजार ४४८ लोकसंख्येपैकी २१ लाख ९२ हजार ५०० नागरिक कोविड प्रतिबंधक लसीकरणासाठी पात्र आहेत. त्यापैकी १९ लाख ३८ हजार पाच नागरिकांनी लसीचा पहिला डोस घेतला असून दुसरा डोस घेणाऱ्यांची संख्या नऊ लाख ७८ हजार ६६८ इतकी आहे. पहिला डोस घेतल्यानंतर दुसऱ्या डोसकडे नागरिकांनी पूर्णपणे पाठ फिरवली आहे. आजच्या घडीला जिल्ह्यात लसीचे दोन लाख ६० हजार डोस शिल्लक आहेत. देशभरात लसीकरणाचा वेग वाढल्यानंतर कोरोना रुग्णांची संख्या घटत गेली. प्रसाराचे प्रमाणही कमी झाले त्यामुळे लोकांमधील कोरोनाबद्दलची भीती कमी होत गेली परिणामी दुसरा डोस घेण्याची मुदत संपली, तरी नागरिक लसीकरण केंद्रांकडे फिरकलेच नाहीत.

**तरीही रायगड जिल्हा सहाव्या क्रमांकावर**

कोरोना प्रतिबंधक लसीकरणात रायगड जिल्हा मुंबई-पुण्याच्या बरोबरीने असून राज्यात सहाव्या क्रमांकावर आहे. मुंबई, पुणे, भंडारा, सिंधुदुर्ग, गोंदिया पाठोपाठ रायगडचा क्रमांक लागतो.

जिल्ह्यात ४५ टक्के नागरिकांनी लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत. ८८ टक्के जणांनी पहिला डोस घेतला आहे. तरीदेखील एक लाख ९८ हजार लोक लसीकरणापासून वंचित आहेत.

ओ मायक्रॉन नावाचा नवीन व्हेरियन्ट समोर आल्याच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. १०० टक्के लसीकरणासाठी प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यात दररोज साधारण अडीच हजारापर्यंत आरटीपीसीआर चाचण्या केल्या जात असून त्यात २० ते २५ रुग्ण पॉझिटीव्ह आढळून येत आहेत.

**करोनाचे संकट अद्याप टळलेले नाही. त्यामुळे नागरिकांनी बेफिकीर राहू नये. लसीकरण करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर करोना प्रतिबंधात्मक नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टीने गरजेचे आहे.**

**-महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड**

# मुरूड समुद्रात पुन्हा जेलीफिशचे आक्रमण

**मुरूड : रामप्रहर वृत्तसेवा**

तालुक्यातील कोळी बांधवांना खोल समुद्रात मासेमारीसाठी गेल्यावर जेलीफिशचा प्रचंड सामना करावा लागत आहे. जाळ्यामध्ये माशांपेक्षा जेलीफिशच जास्त प्रमाणात सापडत आहेत. त्यामुळे मासेमारी संकटात आली आहे. जेलीफिशच्या स्पर्शाने डोळे लाल होणे, शरीराला खाज येणे असे प्रकार घडत आहेत.

**मासेमारी संकटात**

गेल्या दोन वर्षांपासून कोरोना, लॉकडाऊन, वादळे यामुळे मेटाकुटीला आलेला कोळी बांधव जेलीफिशच्या वाढलेल्या संख्येमुळे संकटात सापडला आहे. जेलीफिशमुळे समुद्रातील छोटे व मोठे मासे दूरवर पळून जातात त्यामुळे मासेमारीवर याचा प्रचंड परिणाम होत आहे.

मासेमारी घटल्याने डिझेल खर्चही निघत नसल्याचे रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष व जिल्हा कृती समितीचे अध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले.




## महाराष्ट्र शासन
## महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

### ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ६७ सन २०२१-२०२२

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ७४२१७२ | होळीचा माळ किल्ले रायगड तालुका महाड येथे हेलीपॅड बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ७५२५१८८ | ७६००० | १२००/- | ५ दिवस | वर्ग चार अ व वरील |

### ई निविदेचे वेळापत्रक

**(सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २७/०९/२०१८ मधील मुद्दा क्र. २ मधील टिप अ.क्र. २ नुसार अतिमहत्त्वाच्या हेलीपॅड करिता निविदा प्रसिध्दीचा कालावधी ३ (तीन) दिवसांचा आहे.)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२९/११/२०२१** (१०.०० वाजले पासून) ते दिनांक **०४/१२/२०२१** वेळ १०.३० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **०६/१२/२०२१** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/**३०७२**
दिनांक : **२६/११/२०२१**
**विमाका/कोवि/२०२१-२०२२/२१७**

**सही/**
**(आर. के. बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# पहिली कसोटी अखेर अनिर्णीत

## एका विकेटने हिरावला भारताचा विजय; न्यूझीलंडच्या रवींद्रची चिवट खेळी

**कानपूर : वृत्तसंस्था**

भारत-न्यूझीलंडमध्ये कानपूरच्या ग्रीन पार्क मैदानावर रंगलेल्या कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात चाहत्यांना रंगतदार क्रिकेटचा थरार पाहायला मिळाला. अंधुक प्रकाश आणि एक विकेटच्या अडथळ्यामुळे भारताला विजय हिरावला गेला.

पाचव्या दिवसाचा खेळ संपायला एक तास शिल्लक असताना रचिन रवींद्र आणि एजाज पटेल यांनी झुंजार फलंदाजी करीत भारतीय गोलंदाजांना शेवटची विकेट घेऊ दिली नाही. अखेर पंचांनी दिवसाचा खेळ संपल्याचा निर्णय घेतल्यामुळे दोन्ही संघांमधील हा चित्तथरारक सामना अनिर्णीत राहिला. पदार्पणात शतक ठोकणाऱ्या श्रेयस अय्यरला सामनावीर पुरस्कार मिळाला. आता मालिकेतील दुसरा कसोटी सामना



३ डिसेंबरपासून मुंबईत रंगणार आहे.

पहिल्या डावात अर्धशतकी खेळी केलेला विल यंग दुसऱ्या डावात जास्त योगदान देऊ शकला नाही. फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने भारताला पहिले यश मिळवून दिले. त्याने यंगला (२) बाद केले.

त्यानंतर नाईट वॉचमन विल सोमरविलेला सोबत घेत लॅथमने किल्ला लढवला. लंचनंतर उमेश यादवने सोमरविलेचा अडथळा दूर केला. शुबमन गिलने त्याचा अप्रतिम झेल घेतला. त्यानंतर कप्तान केन विल्यमसन मैदानात आला. या दोघांनी संघाचे शतक फलकावर लावले. अर्धशतकानंतर लॅथम अश्विनकरवी बाद झाला. रॉस टेलर मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. रवींद्र जडेजाने त्याला बोल्ड केले. चहापानानंतर जडेजाने न्यूझीलंडचा कप्तान केन विल्यमसनला (२४) पायचीत पकडले, तर अक्षरने नव्याने फलंदाजीला आलेल्या हेन्री निकोल्सला माघारी धाडले.

शेवटचा एक तास बाकी असताना जडेजाने जेमीसनच्या रूपात न्यूझीलंडला आठवा धक्का दिला. त्यानंतर मात्र रचिन रवींद्र आणि एजाज पटेल यांनी निर्धारित वेळेत संयमी फलंदाजी करत भारताला विकेट मिळू दिली नाही. ९८ षटकात ९ बाद १६५ धावांवर पंचांनी खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. भारताकडून जडेजाने चार, तर अश्विनने तीन बळी घेतले.

### अश्विनने टाकले हरभजनला मागे

*भारताचा फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन भारताकडून सर्वाधिक गडी बाद करणारा दुसरा गोलंदाज ठरा आहे. यासह त्याने फिरकीपटू हरभजन सिंगला मागे टाकले आहे. कानपूर कसोटीतून अश्विनने टीम इंडियात पुनरागमन केले. हरभजनने कसोटी क्रिकेटमध्ये ४१७ बळी घेतले असून आता अश्विन कसोटीत सर्वाधिक विकेट घेणारा भारताचा तिसरा गोलंदाज ठरला आहे. अनिल कुंबळे ६१९ बळी घेऊन भारताकडून पहिल्या स्थानावर कायम आहे, तर दुसऱ्या स्थानी असलेल्या कपिल देवच्या नावावर ४३४ विकेट्स आहेत.*

## आरोग्य प्रहर



### डोळ्यांचा थकवा आणि ताण कमी करण्यासाठी काही उपाय

मोबाइल, लॅपटॉप आणि टीव्ही सतत बघितल्यामुळे बऱ्याच वेळा डोळ्यांना थकवा येतो. लॅपटॉप आणि मोबाइलवर काम करत असताना डोळ्यांवर दाब जाणवतो. त्या वेळी थोडा ब्रेक घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण दिवसातून साधारण १० ते ११ तास मोबाइल आणि लॅपटॉपवर काम करत असतो. त्यामुळे आपले डोळे थकतात. दीर्घकाळ स्क्रीनकडे पाहणे, थकवा आणि झोपेची कमतरता. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

डॉक्टरांच्या मते, रात्री चांगली झोप घेतल्याने तुमच्या डोळ्यांची सूज कमी होऊ शकते. प्रत्येकाने रात्री ८ ते ९ तास झोप घेतली पाहिजे. कोरोनामुळे अजूनही बहुतेक लोक ऑफिसची कामे घरूनच करत आहेत. यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांसमोर दीर्घकाळ काम करण्याची सवय देखील वाढली आहे. ऑफिसमधील सतत कामाच्या ताणामुळे डोळ्यांवर जास्त ताण येऊ नये म्हणून विश्रांती घेणे आवश्यक आहे.

काम करताना येणारा थकवा दूर करण्यासाठी आपण कॉफी पितो, मात्र सतत कॉफी पिणेदेखील आपल्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. कॉफीमुळे झोप कमी होऊ शकते आणि निर्जलीकरण होते. ज्यामुळे डोळ्यांभोवती सूज वाढण्यास मदत होते. झोपण्यापूर्वी सहा तास आधी कॅफिनचे सेवन बंद केले पाहिजे. जर आपण झोपण्याच्या अगोदरदेखील कॉफीचे सेवन केले, तर आपल्याला झोपेची समस्या निर्माण होऊ शकते.

कोरोनामुळे ऑफिसमध्ये काम करण्यापेक्षा घरातून काम केल्याने आपला स्क्रीन टाइम वाढला आहे. लॅपटॉप, फोन, टॅब्लेट यांसारख्या वेगवेगळ्या स्क्रीन्सवर आपण जास्त वेळ घालतो. यामुळे डोळ्यांच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शिवाय सतत एकाच जागी बसून काम केल्यामुळे वजन वाढण्याच्या देखील समस्यांमध्ये वाढ झाली आहे. निरोगी राहण्यासाठी दररोज सकाळी फिरायला जा.

## जागतिक मालिका अंतिम टप्प्यासाठी बॅडमिंटनपटू सात्त्विक-चिराग पात्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॅडमिंटनमधील भारताची पुरुष दुहेरीतील आघाडीची जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी ऐतिहासिक कामगिरी करताना जागतिक मालिकेच्या अंतिम टप्पात (वर्ल्ड टूर फायनल्स) प्रवेश मिळवला. या स्पर्धेतील पुरुष दुहेरीसाठी पात्र ठरणारी ही पहिलीच भारतीय जोडी ठरली आहे.

नुकत्याच झालेल्या इंडोनेशिया खुल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सात्त्विक-चिरागला पराभव पत्करावा लागल्याने त्यांच्या जागतिक



मालिकेच्या अंतिम टप्प्यातील प्रवेशाला धोका निर्माण झाला होता, परंतु अकिरा कोगा आणि तैची सैटो ही जपानी जोडीसुद्धा पराभूत झाल्याने सात्त्विक-चिराग या मानाच्या स्पर्धेसाठी पात्र ठरले. बाली येथे १ ते ५ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे.

**अंतिम टप्प्यासाठी पात्र ठरलेले भारतीय खेळाडू**

**एकेरी :** किदम्बी श्रीकांत (पुरुष), लक्ष्य सेन (पुरुष), पी. व्ही. सिंधू (महिला);

**दुहेरी :** सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी (पुरुष), अश्विनी पोनप्पा आणि एन. सिक्की रेड्डी (महिला).

## पांड्या म्हणतो, माझी निवड करू नका!

### फिटनेस साधण्यावर हार्दिकचे लक्ष

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू हार्दिक पांड्याला सध्या त्याच्या तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित करायचे आहे. म्हणूनच त्याने राष्ट्रीय निवड समितीला आगामी क्रिकेट मालिकेसाठी माझा विचार करू नये, असा संदेश दिला आहे. पाठीच्या दुखापतीमुळे २०१९मध्ये झालेल्या शस्त्रक्रियेनंतर पांड्या भारत आणि मुंबई इंडियन्स या दोन्ही संघांसाठी गोलंदाजी करू शकला नाही.

'क्रिकइन्फो'च्या वृत्तानुसार, हार्दिकचे लक्ष गोलंदाजीमध्ये पुनरागमन करण्यावर आहे आणि त्याने निवड समितीला वेळ देण्यास सांगितले आहे. पांड्या हा टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचा भाग होता, पण तो पाच सामन्यांत फक्त दोनदा गोलंदाजी करू शकला. ज्यामध्ये त्याला यश मिळाले नाही.



टी-२० विश्वचषकापूर्वी, आयपीएलमध्ये पांड्याच्या फिटनेसवर सतत लक्ष ठेवण्यात आले होते, पण स्पर्धेच्या दोन्ही टप्प्यांतील एकाही सामन्यात त्याने गोलंदाजी केली नाही. २०१९मध्ये त्याने आयपीएलमध्ये शेवटची गोलंदाजी केली होती आणि तो २०२०चा हंगाम फलंदाज म्हणून खेळला होता. फिटनेसमुळे पांड्याला न्यूझीलंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या तीन टी-२० मालिकेसाठी संघात निवडण्यात आले नाही आणि आता तो दक्षिण आफ्रिका दौऱ्याचाही भाग नसल्याचे समोर आले आहे.

## डी. पी. लायन्स संघ ठरला यूपीएलचा विजेता



**उरण : बातमीदार**

डी. पी. लायन्स संघाने अंतिम लढतीत जय मल्हार वरियर्स संघाचा पराभव करून उरण प्रीमियर लीग (यूपीएल)चे विजेतेपद पटकाविले. उरण तालुक्यातील भेंडखळ गावाच्या भव्य मैदानावर सुरू झालेली टी-२० लेदर क्रिकेटची लीग स्पर्धा जेएनपीटीच्या हिरव्यागार मैदानावर पूर्णत्वास आली.

या स्पर्धेत अंतिम सामन्यात जय मल्हार संघाने प्रथम फलंदाजी करताना सर्व गडी बाद ११२ धावा केल्या होत्या. हे आव्हान डी. पी. लायन्स संघाने १४.५ षटकांत सहज पार केले. या सामन्यातील सामनावीराचा मानकरी प्रमोद पाटील ठरला. स्पर्धेचा मालिकावीर प्रथमेश म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज, सर्वाधिक अर्धशतक, सर्वाधिक चौकार असे तीन किताब संदीप पाटील (पप्पू) याने पटकाविले. उत्कृष्ट गोलंदाज वैभव पाटील, उत्कृष्ट यष्टीरक्षक विवेक ठाकूर, सर्वाधिक षटकारांचे बक्षीस भूषण म्हात्रे, तर फेअर प्ले अवॉर्ड एम. जी. मराठा टीमला मिळाले.

यूपीएलचे अध्यक्ष शरद ठाकूर यांनी बक्षीस समारंभात दोन्ही संघांचे अभिनंदन करून त्यांना गौरविले, तसेच आगामी २०२२च्या स्पर्धेसाठी तयार असल्याचे सूतोवाच केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उरण लेदर क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्यांनी, तसेच युवा खेळाडूंनी सहकार्य केले.

## नांदा सौख्यभरे!



**पुणे : पनवेल महापालिकेचे नगरसेवक बबन मुकादम व रायगड जि.प.च्या माजी सभापती प्रिया मुकादम यांचा पुत्र सुयोग आणि बालाजी कानवटे यांची कन्या मेघा यांचा विवाह सोमवारी निगडी येथे झाला. या नवदाम्पत्याला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.**


## आरसीबीच्या कर्णधारपदासाठी तिघांमध्ये चुरस

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२१ संपल्यानंतर विराट कोहलीनेही रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचे कर्णधारपद सोडले. आता विराट केवळ आरसीबीमध्ये खेळाडू म्हणून खेळणार आहे. त्यानंतर या संघाच्या कर्णधारपदासाठी तीन खेळाडूंमध्ये चुरस दिसून येते.

विराटने कर्णधारपद सोडल्यानंतर आरसीबीला आता एका नव्या कर्णधाराची गरज भासणार आहे ज्यासाठी अनेक तगडे खेळाडू दावेदार आहेत. त्यामुळे आता नवा कर्णधार कोण असणार याकडे साऱ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे.

आरसीबीच्या नव्या कर्णधाराबाबत अंदाज वर्तवण्यात आला आहे. यासाठी ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ग्लेन मॅक्सवेलचे नाव घेतले जात आहे. दरम्यान, भारताचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने म्हटले आहे की, मॅक्सवेल हा


कर्णधार होण्यासाठी चांगला दावेदार आहे, पण तो मुक्त खेळाडू आहे आणि त्याच्यावर कर्णधारपदाचा दबाव टाकणे योग्य नाही. या खेळाडूला कर्णधारपद दिल्याने त्याच्या खेळावर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आरसीबीला लिलावातूनच खेळाडू शोधावा लागणार आहे.

आरसीबीचा नवा कर्णधार होण्यासाठी अनेक दावेदार असले तरी, असे दोन खेळाडू आहेत जे या पदासाठी खरोखरच प्रबळ उमेदवार असू शकतात. हे खेळाडू दुसरे कोणी नसून के. एल. राहुल आणि श्रेयस अय्यर आहेत. हे दोन्ही खेळाडू आपला संघ सोडून लिलावात जाणार आहेत.

अय्यर आणि राहुल या दोघांनाही कर्णधारपदाचा खूप अनुभव आहे. जिथे एकीकडे राहुलला लखनऊ संघाचा कर्णधार बनवले जाऊ शकते अशा बातम्या ऐकायला मिळत आहेत, तर अय्यरला आरसीबीचा कर्णधार म्हणून पाहिले जाऊ शकते.

सध्या भारताचे उदयोन्मुख खेळाडू चांगली कामगिरी करून लक्ष वेधत आहेत. विशेषत: आयपीएलमध्ये दिग्गज खेळाडूंसोबत खेळायला मिळत असल्याने त्यांच्या अनुभवात भर पडत असल्याचे दिसून येते.

## लॉर्ड शार्दुल ठाकूरने मितालीसोबत उरकला साखरपुडा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरने गर्लफ्रेंड मिताली पारुलकरसोबत साखरपुडा केला असून त्याचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मुंबईतील बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये हा साखरपुडा समारंभ झाला. यामध्ये फक्त त्याचे कुटुंबीय आणि जवळचे नातेवाईक सहभागी झाले होते.

शार्दुल आणि मितालीला त्यांच्या मित्रांनी सोशल मीडियावर शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहे. अद्याप शार्दुल किंवा मितालीने याबाबत काही माहिती दिलेली नाही. शार्दुल आणि मिताली टी-२० वर्ल्डकपनंतर लग्न करणार असल्याची माहिती समजते.

सध्या शार्दुलला बीसीसीआयने विश्रांती दिली आहे. भारताकडून क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत शार्दुल खेळला आहे. त्याने नुकतेच त्याच्या खालच्या क्रमांकावर खेळताना फलंदाजीतही आपली उपयुक्तता सिद्ध केली होती.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com